www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक युवक आधार मराठी

दैं.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 206 वा शुक्रवार दि. 11 एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




# राणाची २० दिवसांसाठी कस्टडी द्या; NIAची मागणी, कोर्टाकडून निकाल सुरक्षित, सुनावणीत काय झाले?

२६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड तहव्वूर राणाला भारतात आणले गेले आहे. भारतात प्रत्यार्पणाला स्थगिती देण्याबाबत अमेरिकेच्या न्यायालयात केलेला अर्ज फेटाळण्यात आला आहे. यानंतर राणाच्या प्रत्यार्पणासाठी भारतातील तपास यंत्रणाची पथके अमेरिकेत दाखल झाली. अखेरीस तहव्वूर राणाला भारतात आणण्यात आले. आता राणाचा ताबा एनआयएने घेतला असून, पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. एनआयएने तहव्वूर राणाला पटियाला हाऊस NIA च्या विशेष न्यायालयात हजर करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, तहव्वूर राणाला कडक सुरक्षा व्यवस्थेत एनआयएच्या विशेष न्यायालयात नेण्यात आले. रात्री उशिरा न्यायालयात सुनावणी सुरू करण्यात आली. यावेळी न्यायालय परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.




एनआयएच्या वतीने वरिष्ठ वकील दयान कृष्णन यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. या प्रकरणाशी संबंधित तथ्ये न्यायालयात सादर केली. न्यायाधीशांना संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली गेली. यानंतर एनआयएचे वकील दयान कृष्णन यांनी तहव्वूर राणा यांच्याविरुद्धच्या कलमांचा उल्लेख करत, संबंधित उपलब्ध पुरावे न्यायालयासमोर सादर केले. तसेच २० दिवसांची कोठडी मागितली.

**रात्री उशिरा न्यायालयात युक्तिवाद**

एनआयएचे वकील दयान कृष्णन यांनी न्यायालयाला सांगितले की, विद्यमान पुरावे आणि इतर तथ्यांची पुष्टी करण्यासाठी राणा यांची कोठडीत चौकशी करणे आवश्यक आहे. न्यायालयाने दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकला. एनआयएने राणाची २० दिवसांची कोठडी मागितल्यानंतर किती दिवसांचा रिमांड द्यायचा, यावर न्यायालयाने आपला निकाल राखून ठेवला. रात्री १ वाजेपर्यंत तरी न्यायालयाने एनआयएच्या मागणीवर निकाल दिलेला नव्हता.

**एनआयएकडून कोठडीचे समर्थन करण्यासाठी ठोस पुरावे सादर**

गुन्हेगारी कटाचा एक **पान २ वर**

# पत्रकार तथा समाजसेविका रुपालताई शिंदे यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा "पनवेल नारिशक्ती"पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई रायगड जिल्हा आयोजित पनवेल तालुका प्रथम वर्धापनदिना निमित्त गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, राजकिय, शैक्षणिक, वैद्यकीय, सांस्कृतिक, कला, क्रीडा, शासकीय, प्रशासकीय, उद्योग, लघु उद्योग, व्यावसायिक, शेती, प्रिंट इलेक्ट्रॉनिक मीडिया,



प्रिंट डिजिटल मीडिया, संपादक, प्रतिनिधी, जेष्ठ पत्रकार, साहित्यिक यांच्या सहित विविध क्षेत्रात करीत असलेल्या सामाजिक कार्याची दखल घेवून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई रायगड जिल्हा पनवेल तालुक्याच्या वतीने मंत्रिमहोदय, खासदार, आमदार, कलाकार, यांच्या शुभहस्ते पनवेलमधील धडाडीच्या समाजसेविका व आपला सत्यवार्ता वृत्तपत्राच्या संपादिका सन्माननीय रुपालीताई शिंदे यांना " पनवेल नारीशक्ती " ह्या पुरस्काराने सन्मानपूर्वक गौरविण्यात येणार आहे. सदरचा सन्मान पुरस्कार सोहळा वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे रविवार दिनांक 13 एप्रिल 2025 रोजी सकाळी 11 वाजता सुरु होणार आह. पनवेल नारिशक्ती पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल रुपालीताई शिंदे यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

# आयएनएचएस संधानी, करंजा येथे

## महिला आणि वृद्धांसाठी आरोग्य शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**उरणशहरप्रतिनिधी/सायली साळुंके**

जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधित नेव्ही वेलनेस अँड वेलफेअर असोसिएशन करंजा यांनी नेव्हल हॉस्पिटल आयएनएचएस संधानी करंजा यांच्या सहकार्याने, नेव्हल हॉस्पिटल आयएनएचएस संधानी,करंजा येथे डॉक्टर्स फॉर यू (युनिसेफ द्वारे समर्थित) च्या अंतर्गत महिला आणि वृद्धांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले.

या उपक्रमाचा उद्देश नौदल स्टेशन करंजा येथे नौदल समुदायातील महिला आणि वृद्ध प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्रोत्साहन देणे हा होता. या शिबिरात नौदल कुटुंबातील महिला आणि पालकांचा उत्साही सहभाग होता, ज्यांनी विविध प्रकारच्या वैद्यकीय सेवांचा लाभ घेतला या आरोग्य शिबिरात सामान्य आरोग्य तपासणी, स्तन आणि गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कर्करोगाची तपासणी, अशक्तपणा तपासणी, रक्तातील साखरेची चाचणी आणि अवलंबून असलेल्या पालकांसाठी तोंडाच्या कर्करोगाची तपासणी यांचा समावेश होता. याव्यतिरिक्त, तज्ञ डॉक्टरांनी मोलाचे मार्गदर्शन केले .या कार्यक्रमाला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला,




# पनवेल तालुक्यातील ओवळे गावात आई गावदेवी ओवळू मातेची यात्रा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील ओवळे गावात दिनांक 11 एप्रिल रोजी शुक्रवारी आई गावदेवी ओवळू मातेची यात्रा संपन्न होतआहे. त्यानिमित्त छकड्यांच्या बिन जोड जंगी शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ठाणे रायगड पालघर सेवाभावी बैलगाडी संघटनेचे उपाध्यक्ष नंदराज शेठ मुंगाजी यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होत आहे. या स्पर्धेत 200 ते 250 बैलगाडा मालक सहभागी होणार आहेत. स्पर्धेची जोरदार तयारी करण्यात आली आहे. या या स्पर्धेची अंतिम तयारी पूर्ण झाली आहे. स्पर्धेच्या पूर्वसंध्येला नंदराज शेठ मुंगाजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अंतिम पाहणी केली. गुरुवारी 10 एप्रिल रोजी ही पाहणी करण्यात आली . पाहणी पूर्ण झाल्यानंतर पत्रकारांशी बोलताना नंदराज शेठ मुंगाजी यांनी स्पर्धेचा उद्देश स्पष्ट केला. सरकारच्या नियमांच्या अधीन राहून ही स्पर्धा पार पडेल असे त्यांनी सांगितले. आमदार हिंदकेसरी पनवेल व उरण तसेच सरपंच हिंदकेसरी ओवळे यांचा यामध्ये विशेष सहभाग आहे. ओवळे गावचे सरपंच रुपेश गायकवाड आणि त्यांचे सहकारी स्पर्धा यशस्वीपणे पार पडण्यासाठी नंदराज शेठ मुगाची यांच्या नेतृत्वाखाली मेहनत घेत आहेत. बैलगाडी शर्यतीच्या यशस्वीतेसाठी हरिदास मढवी, राकेश गायकवाड व कमलाकर गायकवाड ज्ञानेश्वर म्हात्रे जयवंत घोपरकर मिथुन दापोलकर राहुल कांबळे मारुती दापोलकर विकास म्हात्रे अरुण म्हात्रे, महेश गव्हाणकर, गजानन म्हात्रे झटत आहेत.




भाजपा युवा नेते मनखुश नाईक यांच्या वाढदिवसाचेही औचित्य साधण्यात आले आहे... उद्या शुक्रवारी 11 एप्रिल रोजी त्यांचा वाढदिवस असल्याने या बैलगाडी स्पर्धा संपन्न होत आहेत.

# सरपंच व उपसरपंच चषक 2025 आयोजित डिंग डॉग ग्रुप धोदाणी च्या वतीने सामन्यात खांदा 11 स्टार संघ विजयी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल येथील मालडुंगे ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच चषक क्रिकेट सामन्यांचे डिंग डॉग ग्रुप धोदाणी च्या वतीने सहा दिवसासाठी नाईट क्रिकेट टेनिस स्पर्धा आयोजित केले होते. या खेळात अनेक संघाने आपला उत्तम खेळ करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. सरपंच व उपसरपंच चषक साठी प्रथम क्रमांक करिता खांदा 11 स्टार संघ यांना रोख रक्कम 1,00,000 लाख रुपये व चषक, द्वितीय क्रमांक टावरवाडी यांना 50,000 हजार व चषक, तृतीय क्रमांक मोरबे यांना 30,000 हजार व चषक, चतुर्थ क्रमांक **पान २ वर**




# उरण खोपटे गावात पाणीटंचाईचा कळस;

## ग्रामपंचायतीवर संतप्त नागरिकांचा बेंडबाजा मोर्चा

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

खोपटे गावातील पाणीपुरवठा योजनेवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले असतानाही, नागरिकांना तीन-तीन दिवस पिण्याचे पाणी मिळत नसल्याने आज ग्रामस्थांनी थेट बांधपाडा ग्रामपंचायतीवर मोर्चा काढला.

संदिग्ध पाणीपुरवठा लाईन, चुकीच्या पद्धतीने योजनेची हाताळणी आणि अवैध नळजोडणांवर कारवाईचा अभाव यामुळे गावात पाण्यासाठी नागरिकांची बाबाबोंब सुरू आहे. विशेषतः महिलांना सार्वजनिक तलाव व तळ्यांवर कपडे धुण्यासाठी जावे लागत आहे.

खोपटे गावात सात पाड्यांचा समावेश असून, एकाच साठवण टाकीवर संपूर्ण पाणीपुरवठा अवलंबून आहे. ही टाकी धसखोशी पाड्याजवळ आहे. टाकी व गाव यामधील लांब अंतरामुळे पाईपलाईन भरायलाच पंधरा मिनिटे जातात. त्यानंतर केवळ पंधरा मिनिटेच पाणीपुरवठा होतो. नागरिकांना घरांमध्ये पाणी खेचण्यासाठी विद्युत पंपांचा वापर करावा लागतो, परिणामी विजेच्या बिलाचा बोजा वाढत आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून, बेंडबाजासह ग्रामपंचायतीवर मोर्चा काढण्यात आला. ग्रामसेवक आर. व्ही. सातंगे व प्रशासक प्रियांका पाटील यांनी गावकऱ्यांचे निवेदन स्वीकारून लवकरच सुधारणा करण्याचे आश्वासन दिले आहे.





## संपादकीय

# समतेची मशाल पेटवली अन् क्रांती घडवली, महात्मा फुले

विद्येविना मती गेली ।
मतीविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली ।
गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।
**महात्मा जोतिबा फुले**

आधुनिक भारतातील समाज सुधारक ज्यांनी पुण्याला मुलींची पहिली शाळा सुरू केली ज्यांनी आपली पत्नी सावित्रीबाईला शिक्षण देऊन तिला समाजामध्ये शिकवण्यासाठी सुशिक्षित बनवले, आणि देशातील पहिली शिक्षिका असण्याचा मान प्रदान केला, समाजाचे दगड धोंडे आपल्या अंगावर घेत या राष्ट्राला शिक्षणाचे महत्त्व सांगितले, अशे थोर समाज सुधारक महात्मा जोतिबा फुले यांची आज जयंती आहे. साताऱ्यातील कटगुण या गावी ११ एप्रिल १८२७ रोजी जोतिबा फुले यांचा जन्म झाला.

ज्योतिबांनी अनेक ग्रंथांचे लिखाण सुद्धा केलेले आहे, शेतकऱ्याचा असूड, ब्राम्हणांचे कसब, अश्या अनेक प्रकारच्या ग्रंथांमधून त्यांनी समाज प्रबोधन केले होते, "प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला तेच पोहू शकतात ज्यांचे निर्धार ठाम असतात, ज्यांना कुठलेतरी ध्येय गाठायचे असते." असे म्हणणाऱ्या ज्योतीबांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली; तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीबाई यांनी केले. सावित्रीबाई यांच्याबरोबर १९ स्त्रियांनी सत्यशोधक समाजाचे कार्य सुरू केले. महाराष्ट्रातील तळागाळापर्यंत ही चळवळ पोहोचली. छत्रपती शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला. 'सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ॥' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली.

**महात्मा जोतिबा फुलेंचे साहित्य**

महात्मा फुले यांनी लिहलेला 'सार्वजनिक सत्यधर्म' हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. या समाजाचे मुखपत्र म्हणून 'दीनबंधू' हे साप्ताहिक चालविले जात असे. तुकारामाच्या अभंगांच्या धर्तीवर त्यांनी अनेक 'अखंड' रचले. आपला 'गुलामगिरी' ग्रंथ अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना त्यांनी समर्पित केला. 'अस्पृश्यांची कैफियत' हा महात्मा फुलेंचा अप्रकाशित ग्रंथ आहे. सार्वजनिक सत्यधर्म हा त्यांचा ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर इ.स. १८९१ मध्ये प्रकाशित झाला.

# पेण शहरातील स्वातंत्र्य सेनानी स्मारकाचे नुतनीकरण व्हावे

## 'माझं पेण' सामाजिक संघटनेचे तहसीलदारांना निवेद

**पेण**
**दैनिक युवक आधार**
**पेण वार्ताहर**

पेण शहरातील महात्मा गांधी वाचनालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर असलेल्या स्वातंत्र्यसेनानी स्मारकाचे नुतनीकरण व्हावे, अशी मागणी 'माझं पेण' या सामाजिक संघटनेतर्फे करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन बुधवारी (९ एप्रिल) पोलीस प्रशासन, तहसीलदार व पेण नगरपरिषदेला देण्यात आले. यावेळी राजेंद्र पाटील, गणेश तांडेल, सूरज, आप्पा सत्वे, अभिमन्यू म्हात्रे, सी. आर. म्हात्रे, सुधाकर पिंगळे, गणेश कोळी, आर.एन. पाटील आदी उपस्थित होते. सध्याच्या घडीला स्वातंत्र्य सेनानी स्मारक परिसराचे फेरीवाले, खाजगी दुकाने, राजकीय पक्ष संघटना, संस्था, विविध जाहिराती, वाढदिवस शुभेच्छांच्या बॅनर्समुळे विद्रुपीकरण झाले आहे. मात्र नगरपरिषदेमार्फत कठोर कारवाई का केली जात नाही? असा सवाल संघटनेने उपस्थित केले आहे. या स्मारकातील दिग्गज सेनानींची नावे दिसून येत नाही. ती नावे स्थापित करण्यात यावी. स्मारकाचे नुतनीकरण करावे, अनधिकृत बॅनरबाजीला मज्जाव करावा, नो पार्किंग झोन, जाहीर करणे, अतिक्रमण विरोधी पथकाकडून योग्य कारवाई करुन हा परिसर स्वच्छ आणि मनमोहक ठेऊन स्मारकाचे पवित्र्य राखावे, अशा मागण्या माझं पेण संघटनेतर्फे करण्यात आल्या आहेत.




## रविवारी नवी मुंबईत "खुशरंग संगीत महोत्सव"

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ वाशी आणि हिंदुस्तानी संगीत अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १३ एप्रिल रोजी नवी मुंबईत "खुशरंग संगीत महोत्सव २०२५" चे आयोजन करण्यात आले आहे. हा बहारदार संगीत सोहळा वाशी बस डेपोजवळील अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळाच्या सभागृहात सायंकाळी ५ वाजता सुरू होणार असून रात्री ९ वाजेपर्यंत रसिकांना शास्त्रीय संगीताचा सुरेल आनंद घेता येणार आहे. या महोत्सवात रायगडचे सुपुत्र सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी आणि वाराणसी येथील विदुषी शिवानी आचार्य यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. यावेळी अहिल्यानगर येथील प्रसिद्ध तबलावादक विश्वास जाधव यांचे सोलो तबला वादन होणार आहे. संगीत साथ म्हणून पं. निषाद पवार, पं. विनायक नाईक यांचे तबलावादन, अभिषेक काटे व सल्ला मनोज कुमार यांचे हार्मोनियम वादन होणार आहे. त्यामुळे एकूणच हा कार्यक्रम नवोदित कलाकारांपासून ते ज्येष्ठ संगीतरसिकांपर्यंत सगळ्यांसाठी एक पर्वणीच ठरणार आहे.

## भगवान महावीर जयंतीनिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून जैन धर्मीयांना शुभेच्छा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



आज संपूर्ण देशात भगवान महावीर स्वामी जयंती मोठ्या श्रद्धेने साजरी होत आहे. या पवित्र दिनानिमित्त लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी जैन समाजातील बांधवांना शुभेच्छा दिल्या."अहिंसा परमो धर्मः" आणि "जिओ और जिने दो" या तत्वज्ञानाचा अवलंब करत जगाला समता, करुणा व शांततेचा संदेश देणारे भगवान महावीर यांचे विचार आजही तितकेच मार्गदर्शक ठरत आहेत, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात सांगितले. भगवान महावीर जयंतीनिमित्त पनवेलमध्ये सकल जैन समाजाच्या वतीने भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेत आमदार प्रशांत ठाकूर यांनीही सहभाग घेतला आणि नागरिकांशी संवाद साधत त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी संजय जैन, नितीन मुनोथ, राजेश बांठिया, किरण परमार, चतुरमल मेहता यांच्यासह समाजातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# ॥ महात्मा फुले: शेतकऱ्यांचे कैवारी ॥

(11 एप्रिल: महात्मा जोतीराव फुले जयंती विशेष.)

महात्मा जोतिराव गोविंदराव फुले यांचा जन्म दि.११ एप्रिल १८२७ रोजी झाला. हे एक भारतीय समाजसुधारक, समाजप्रबोधक, विचारवंत, समाजसेवक, लेखक, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारी कार्यकर्ते होते. त्यांना महात्मा फुले आणि जोतिबा फुले म्हणूनही ओळखले जाते. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या. सप्टेंबर 1873मध्ये त्यांनी महाराष्ट्रात सत्यशोधक समाज नावाची संघटना स्थापन केली. त्यांनी स्त्रियांच्या आणि मागासलेल्या आणि अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी अनेक कामे केली. समाजातील सर्व घटकांना शिक्षण देण्याचे ते खंबीर पुरस्कर्ते होते. ते भारतीय समाजात जात-आधारित विभाजन आणि भेदभावाच्या विरोधात होते. स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळवून देणे, बालविवाहाला विरोध करणे, विधवा विवाहाला पाठिंबा देणे हे त्यांचे मूळ उद्दिष्ट होते. म.फुले यांना समाजाला कुप्रथा, अंधश्रद्धेच्या पाशातून मुक्त करायचे होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य महिलांना शिक्षण देण्यात, महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यात घालवले. १९व्या शतकात महिलांना शिक्षण दिले जात नव्हते. फुले यांना स्त्री-पुरुष भेदभावापासून वाचवायचे होते. त्यांनी पुण्यात मुलींसाठी भारतातील पहिली शाळा बांधली. त्यावेळच्या स्त्रियांच्या दयनीय अवस्थेमुळे फुले खूप व्यथित आणि दुःखी झाले होते, म्हणूनच त्यांनी समाजात क्रांतिकारी बदल घडवून आणण्याचा दृढ निश्चय केला. त्यांनी स्वतः त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या. सुरुवातीचे जीवन: महात्मा ज्योतिबा फुले एका वर्षांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचे कुटुंब अनेक पिढ्यांपूर्वी साताऱ्याहून पुण्यात आले आणि फुलांचे गजरे बनवू लागले. त्यामुळे माळीच्या कामात गुंतलेली ही माणसे 'फुले' म्हणून ओळखली जायची. ज्योतिबांनी काही काळापूर्वीपर्यंत मराठीतून शिक्षण घेतले, ते सोडून दिले आणि नंतर वयाच्या २१व्या वर्षी इंग्रजीमध्ये सातवीचे शिक्षण पूर्ण केले. सन १८४०मध्ये त्यांचा विवाह सावित्रीबाई यांच्याशी झाला, त्यानंतर त्या स्वतः प्रसिद्ध समाजसेविका झाल्या. पती-पत्नी दोघांनीही दलित आणि स्त्री शिक्षण क्षेत्रात एकत्र काम केले. ते एक कष्टकरी आणि सामाजिक कार्यकर्ता होते. कार्यक्षेत्र: त्यांनी विधवा आणि महिलांच्या कल्याणासाठी खूप काम केले, त्यासोबतच त्यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठीही खूप प्रयत्न केले. ज्योतिबांना संतांची चरित्रे वाचण्याची खूप आवड होती. जेव्हा देवासमोर सर्व स्त्री-पुरुष समान असतात, तेव्हा उच्च-नीच असा भेद का असावा, हे त्यांना कळून चुकले होते. स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी फुले यांनी सन १८४८मध्ये शाळा उघडली. या कामासाठी देशातील पहिली शाळा होती. मुलींना शिकवण्यासाठी त्यांना शिक्षक मिळाला नाही, म्हणून त्यांनी स्वतः काही दिवस हे काम करून पत्नी सावित्री फुले यांना पात्र बनवले. काही लोकांनी सुरुवातीपासूनच त्यांच्या कामात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला, पण फुले पुढे सरकत असताना त्यांनी वडिलांवर दबाव आणून पती-पत्नीला घराबाहेर काढले, यामुळे त्यांचे काम काही काळ थांबले, पण लवकरच त्यांनी मुलींसाठी एकामागून एक तीन शाळा उघडल्या. महात्मा पदवी: गरीब आणि दुर्बलांना न्याय मिळवून देण्यासाठी ज्योतिबांनी सन १८७३मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांची समाजसेवा पाहून सन १८८८मध्ये मुंबईत एका विशाल सभेत त्यांना "महात्मा" ही पदवी देण्यात आली. ज्योतिबांनी ब्राह्मण-पुरोहिताविना विवाह विधी सुरू केला आणि त्याला मुंबई उच्च न्यायालयानेही मान्यता दिली. ते बालविवाहाच्या विरोधात होते आणि विधवा पुनर्विवाहाचे समर्थक होते. आपल्या हयातीत त्यांनी गुलामगिरी, तृतीय रत्न, छत्रपती शिवाजी, राजा भोसलेंचा पवाडा, शेतकऱ्यांचा आसूड, अस्पृश्यांचा टाहो अशी अनेक पुस्तकेही लिहिली. महात्मा ज्योतिबा आणि त्यांच्या संघटनेच्या संघर्षामुळे सरकारने "कृषी कायदा" मंजूर केला. धर्म, समाज आणि परंपरा यांचे सत्य समोर आणण्यासाठी त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली. सन १८८३मध्ये स्त्रियांना शिक्षण देण्याच्या महान कार्यासाठी, त्यांना तत्कालीन ब्रिटिश भारतीय सरकारने "स्त्री शिक्षणाचे जनक" म्हणून गौरवले. दि.२८ नोव्हेंबर १८९० रोजी वयाच्या ६३व्या वर्षी पुणे येथे त्यांचे दुःखद निधन झाले.

// पावन जयंतीपर्वावर म. राष्ट्रपितामह जोतीराव फुलेजींना शतदा विनम्र अभिवादन /

– सावित्री–जोतिबांचा लेकरू –
श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर, गडचिरोली.



## सरपंच व उपसरपंच चषक 2025 आयोजित डिंग डॉग ग्रुप धोदाणी च्या वतीने सामन्यात खांदा 11 स्टार संघ विजयी

**पान १ वरुन** बोहोनोली यांना 25,000 हजार व चषक, पंचम क्रमांक कोंडीचीवाडी यांना 25,000 हजार व चषक, षष्टम क्रमांक गाढेश्वर यांना 25,000 हजार व चषक असे पारितोषिक देण्यात आले तसेच मालिकावीर सुदाम नाईक व रंजीत वाघे यांना इलेक्ट्रिक बाइक दिल्या आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक - प्रधान वाघ,,उत्कृष्ट गोलंदाज - अजय खंडवी,, उत्कृष्ट फलंदाज - राहुल भगत यांना मिळाले. क्रिकेटचे सामने पाहण्यासाठी प्रेक्षकांची भरपुर गर्दी पाहायला मिळाली होती. ही स्पर्धा सरपंच सिताराम जानू चौधरी, उपसरपंच जनार्दन नाग्या निरगुडा व डिंग डॉग ग्रुप धोदाणी यांच्या वतीने भरवण्यात आलेली होती. या स्पर्धेसाठी पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील,पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, विभागीय अध्यक्ष राजेश भोईर, ग्रामपंचायत मालडुंगे सदस्य अर्जुन कांबडी, विष्णू पारधी, सुभाष नाईक, पोलीस पाटील महादू जाधव, पोलीस पाटील नारायण, चौधरी, दत्ता भस्मा, मोहन चौधरी, मंगेश चौधरी,आलेक भस्मा, हासूराम वाघ,चाहू चौधरी,किसन सांबरी, बाळू चौधरी,काळूराम वाघ,सोमनाथ चौधरी, पद्माकर चौधरी, राजेश फसाळे तसेच या स्पर्धेसाठी आदिवासी समाज संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष मालू निरगुडे, हरीश वीर, दत्तात्रेय निरगुडा,पांडुरंग पारधी, महेश ठोंबरा , सुनील पारधी,नारायण बरतोड, गोविंद शिद, विजय निरगुडा, सोमा निरगुडा, अंकुश वाघ, गणेश पारधी असे अनेक मान्यवर पाहुण्यांची फायनल च्या दिवशी स्पर्धेसाठी उपस्थिती होती. स्पर्धेसाठी डिंग डॉंग ग्रुपच्या वतीने लहान मुलांना आणि प्रेक्षकांना बघण्यासाठी मोटू , पतलू यांच्या उपस्थितीत मुलांमध्ये वातावरण होते. या स्पर्धेला सर्वांचा प्रतिसाद खूप मोठ्या प्रमाणात मिळाल्याने आणि डिंग डॉंग ग्रुप धोदाणी हे दिवस-रात्र मेहनत करतात आणि सरपंच,उपसरपंच चषक दरवर्षी आयोजित करतात. तसेच सर्व खेळाडू सहभागी होतात. डिंग डॉंग ग्रुप धोदाणी आयोजकांचे अभिनंदन व स्वागत करतो. असे सरपंच सिताराम चौधरी, उपसरपंच जनार्दन निरगुडा यांनी सांगितले. आणि प्रेक्षकांचे,कार्यकर्त्यांचे व नागरिकांचे आभार मानले.

# उरण-द्रोणागिरीत गगनचुंबी टॉवर्स, पण

## फायर-स्ट्रक्चरल ऑडिट केवळ कागदोपत्री!

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण आणि द्रोणागिरी नोडमध्ये मोठ्या प्रमाणात गगनचुंबी इमारती उभारल्या जात आहेत. अशा इमारतींसाठी फायर आणि स्ट्रक्चरल ऑडिट बंधनकारक असले तरी त्याची अंमलबजावणी केवळ कागदावरच होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. गंभीर बाब म्हणजे या उंच इमारतींमध्ये फायर सेफ्टी उपकरणांची योग्य पूर्तता नाही, स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल संशयास्पद आहेत, आणि त्यामुळे हजारो नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी नगरपरिषद, सिडको, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अग्निशमन विभागाकडे तक्रार अर्ज सादर केला आहे. यात प्रत्येक इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करून ऑडिट रिपोर्टच्या सत्यतेची चौकशी करावी. ज्या इमारतींमध्ये सुरक्षाव्यवस्था अपूर्ण आहेत, त्या बिल्डर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच फायर आणि स्ट्रक्चरल ऑडिटची नियमित तपासणी करण्यात यावी. या इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या जीवितास धोका असून, दुर्घटना घडण्याची वाट पाहण्यापेक्षा प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. हा गंभीर प्रकार समोर आल्यानंतर प्रशासन यावर कोणती भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. जर योग्य ती कारवाई झाली नाही, तर या प्रकरणी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे



## राणाची २० दिवसांसाठी कस्टडी द्या; NIAची मागणी, कोर्टाकडून निकाल सुरक्षित, सुनावणीत काय झाले?

**पान १ वरुन** भाग म्हणून आरोपी क्रमांक १ डेव्हिड कोलमन हेडलीने भारत भेटीपूर्वी तहव्वूर राणाशी संपूर्ण ऑपरेशनची चर्चा केली होती. संभाव्य आव्हानांचा अंदाज घेत, हेडलीने राणाला त्याच्या वस्तू आणि मालमत्तेची माहिती देणारा ईमेल पाठवला होता. त्याने राणाला इलियास काश्मिरी आणि अब्दुर रहमानचा कटात सहभागाची माहिती दिली. एनआयएने २६/११ च्या मुंबई हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणाने पाठवलेल्या ईमेलसह त्याच्या कोठडीचे समर्थन करण्यासाठी ठोस पुरावे सादर केले. या भयानक कटाचा उलगडा करण्यासाठी कोठडीत चौकशी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या प्राणघातक दहशतवादी हल्ल्यात राणाची भूमिका काय होती, याचीही चौकशी तपास यंत्रणा करतील, असे एनआयएच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले.

दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी न्यायालय परिसरात सीआयएसएफसह निमलष्करी दलांचे जवानही तैनात करण्यात आले आहेत. भारतात दाखल झालेल्या तहव्वुर राणाचा एक फोटो समोर आला आहे. राणाचा हा पाठमोरा फोटो असून, यात त्याचे पांढरे झालेले केस आणि अंगावर चॉकलेटी रंगाचे कपडे दिसत आहेत.

# भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सव वडकी इथे मोठ्या उत्साहात संपन्न

### जो खुद के सुखो को त्याग कर दुसरो को सुख दे वो है भगवान महावीर साध्वी श्री पुण्यरत्नाश्रीजी मारासाब

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-**
**जितेंद्र खोडे**



**वडकीः-** येथे आज दि.१०एप्रील गुरुवार ला या वर्षीचा भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून हा कार्यक्रम दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी राळेगाव व मारेगाव या दोन तालुक्यातील जैन समाज बावीस वर्षांपासून एकत्रीत येऊन खैरी,वडकी,कुंभा,मार्डी,वनोजा (देवी)व मारेगाव इथे साजरी करत असतात हे या दोन तालुक्यातील जैन समाजाचे वैशिष्ट्य आहे. या वर्षी चा वडकी येथिल श्री संघाचे अहोभाग्य की भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सव भगवान महावीर यांचे अनुयायी साध्वी श्री पुण्यरत्नाश्रीजी माराब व त्यांच्या सुशिष्या साध्वी श्री सुरत्नाश्रीजी मारासाब यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली सर्व प्रथम झांबड यांचे घरापासून भगवान महावीर की जय,त्रिशला नंदन वीर की जय बोला महावीर की,या नाऱ्याच्या जल्लोषात व शहनाई च्या मधुर स्वरात व वर वाज्याच्या आवाजात रथयात्रा काढण्यात आली व ज्या ठिकाणी जन्मोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता तिथ पर्यंत जैन बांधव रथयात्रे मध्ये शामील झाले वडकी येथिल सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी तेथील योग्य ठिकाणी भगवान महावीर स्वामी यांची रथयात्रा पोहोचताच भगवान महावीर स्वामी यांचा प्रतिमेला वंदन केले व रथयात्रेत शामील झालेल्या जैन बांधवांना महावीर जन्मकल्याणक च्या शुभेच्छा दिल्या व समता बंधुत्वतेचे प्रतिक म्हणून भगवान महावीर स्वामी यांचा प्रतिमेचे पुजन अहिंसा चे पालण करत मोत्यांच्या माळेनी , महात्मा जोतिबाजी फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले नंतर रथयात्रा आयोजित स्थळी पोहचले व कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली सर्व प्रथम नवकार महामंत्र नी पंचपरमेष्ठी देवांना नमस्कार करणण्यात आला नंतर साध्वी श्री पुण्यरत्नाश्रीजी मारासाब यांचे प्रवचन प्रवचनात पुण्यरत्नाश्रीजी मारासाब उपदेश करतांना आज आपण भगवान महावीर स्वामी यांच जन्मकल्याणक दिवस साजर करत आहो भगवान स्वामींच्या जिवनावर प्रकाश टाकत असताना भगवान महावीर हे करूणाचे धारी होते. भगवान महावीर स्वामी हे स्वताच सुखाची चिंता न करता दुसऱ्या जिवांच्या सुखाची चिंता करून जगणारे होते कोणत्या ही जिवाची हिंसा होऊ नये म्हणून व कोणत्याही जिवाला त्रास होऊ नये म्हणून ते एकटेच राजपाठ च्या त्याग करून निघून गेले व एकट्यांनीच दिक्षा ग्रहण केली यावर त्यांनी उपदेश केला नंतर वडकी श्री संघ द्वारे मारेगाव श्री संघ,खैरी श्री संघ,मार्डी श्री संघ,वनोजा देवी श्री संघ कुंभा श्री संघ व मारेगाव येथिल डॉ.लोढा यांचे स्वागत करण्यात आले भगवान महावीर स्वामी यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा व्हावा म्हणून छोट्या छोट्या चिमुकल्यांन पासून तर मोठ्यांन पर्यंत कोणी नृत्य सादर केले कोणी भजन गायिले तर कोणी नाटीका पेश केली या जन्मोत्सव चा सर्व जैन बांधवांच्या मनात उत्साह दिसून येत होता या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संगिताजी मोहता यांनी तर प्रास्ताविक अश्विनी झांबड यांनी केले तर आभार प्रदर्शन बालुजी बाघमार यांनी केले असून मंगलपाठानी कार्यक्रम ची सांगता करण्यात आली व नंतर भगवान महावीर जन्मकल्याणक निमित्त महाप्रसादाचे चे आयोजन करण्यात आले होते सर्वांनी महाप्रसादीचा आस्वाद घेतला व पुढील वर्षाला मार्डी या गावी जन्मकल्याणक साजरा करण्यात येईल अशी घोषणा केली.

# राळेगाव तालुक्यातील धानोरा येथे रामनवमी उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः**
**-जितेंद्र खोडे**

**राळेगाव :-** तालुक्यातील धानोरा येथे दि.०६-०४-२०२५ ला रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली ,यावेळी प्रभू श्री राम यांच्या प्रतिमेचे पूजन वाढोणा (बाजार) बिट जमदार दिपक वाड्रंसकर, प्रमोद ढाले, जितेंद्र कहुरके, प्रविण पन्नासे, संजय कारवटकर, गजानन सुरकर, सुहास मुडे, यांच्या हस्ते करण्यात आले व संपुर्ण गावातून प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेची ट्रॅक्टर वर भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली ,रामनवमी ही गावागावात संपूर्ण भारत देशात उत्साहात साजरी करण्यात येते, प्रभू श्रीराम यांचे महत्व काय हे सर्वांना माहीत आहे. संत नामदेवाने प्रभू श्रीराम यांच्याबद्दल एक कविता लिहिली( उत्तम हा चैत्र मास ,ऋतू वसंताचा शुक्लपक्षी ही नववी ,उभे सुरवर व्योमी, माध्यन्हासी ये दिनकर, पळभरी होई स्थीर! अशा या शुभमुहूर्तावर प्रभू श्रीरामाचा जन्म झाला राम आणि त्याचे चरित्र आपल्या संस्कृतीला भूषणभुत आहे ,राम आपल्या कुटुंबासाठी धर्मासाठी आणि देशासाठी लढला त्याला मर्यादा पुरुषोत्तम म्हणून आपण गौरवतो आजही त्याचे गुण सर्वत्र भक्ती भवानी गायले जातात म्हणून संपूर्ण भारत देशात प्रभू श्रीराम यांचा जन्म मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतात त्याचाच एक भाग म्हणून राळेगाव तालुक्यातील धानोरा येथे दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा रामनवमीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, यावेळी धानोरा येथील अनेक नागरिक हजर होते त्याचप्रमाणे वडकी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुखदेव भोरखडे यांनी सुद्धा धानोरा येथील रामनवमीच्या मिरवणुकीला भेट दिली व सर्वा सोबत चर्चा केली यावेळी शिवशक्ती युवा बहुउद्देशीय संस्था धानोरा या मंडळाच्या सर्व सदस्यानी या रामनवमीचा कार्यक्रमाचे आयोजन केले.

दैनिक युवक आधार (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle


दखल

## शेवा कोळीवाडा विस्थापित परदेशी कुटुंबांचा पाण्यासाठी संघर्ष;

### प्रशासकीय अधिकाऱ्यांची आश्वासनाची खिरापत

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

शेवा कोळीवाडा येथून1984 साली विस्थापित झालेल्या “अनंत परदेशी” कुटुंबांला गेल्या अनेक महिन्यांपासून पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे वारंवार दुर्लक्ष झाल्याने संतप्त कुटुंबांनी 17 मार्च रोजी आमरण उपोषण सुरू केले होते. त्यावेळी प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि राजकीय पदाधिकाऱ्यांनी दोन ते तीन दिवसांत प्रश्न सोडवण्याचे ठाम आश्वासन दिले होते. उपोषणकर्ते अनंत परदेशी हे 89 वर्षाचे वयोवृद्ध असताना त्यांना अधिकारी वर्गानी दोन तीन दिवसांत हा प्रश्न मार्गी लावतो असे आश्वासन दिल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले होते. मात्र आश्वासन देऊन महिना होण्यास येऊनही आजतागायत दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झालेली दिसत नाही.त्यामुळे प्रकल्पग्रस्थांमध्येसंतापाचे वातावरण आहे. जेएनपीटी प्रकल्पासाठी शेवा व शेवा कोळीवाडा गाव पूर्णपणे विस्थापितकरण्यात आल्यावर येथील ग्रामस्थांना स्थलांतरीत करण्यात आले होते, त्यापैकी एक परदेशी कुटुंब असून पुनर्वसनानंतर बोरी पाखाडी स्मशानभूमीजवळ वास्तव्यास असलेल्या परदेशी कुटुंबांना आजही नागरी सुविधा व पाणीपुरवठा मिळत नाही. गेल्या तीन महिन्यांपासून ते पाण्याविना राहतात आहेत. विविध सरकारी कार्यालयांमध्ये सातत्याने पाठपुरावा करूनही त्यामधून कोणतेच निष्पन्न झाले नाही,इतकेच नाहीतर न्यायालयानेही त्यांच्या बाजूने निर्णय दिला असतानाही त्यांना जेएनपीटीने दिलेल्या ग्रामपंचायतीच्या पाणी लाईनवरून पाणी मिळत नाही. एकप्रकारे 89 वर्षीय उपोषणकर्ते प्रकल्पग्रस्थ अनंत परदेशी कुटूंबियांची फसवणूक केली असल्याची चर्चा जनतेत जोरदारपणे सुरू आहे.. अखेर 89 वर्षीय “अनंत परदेशी” कुटुंबांला उपोषणाच्या वेळी पोलिस प्रशासन, पंचायत समिती व सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत 20 मार्च पर्यंत पाणीपुरवठा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यामुळे “अनंत परदेशी” कुटुंबांनी उपोषणकाही काळ स्थगित केले, मात्र, अद्यापही पिण्याच्या पाण्याची पाणी समस्या तशीच आहे. या सर्व प्रकारामुळे प्रशासनाने दिलेली आश्वासने केवळ वेळ मारून नेण्याचे साधन ठरली, असा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. परिणामी प्रशासना विरोधात जनतेत तीव्र नाराजी पसरली आहे.



## नवव्या माळ्याचा स्लॅब कोसळल्याने सात कामगार जखमी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल शहरातील वाल्मीक नगर, ठाणा नाका रोड, स्वामी नित्यानंद मार्गावरील नवीन इमारतीच्या नवव्या माळ्याचा स्लॅब कोसळल्याने सात जण जखमी झाले आहेत. यापैकी दोघेजण गंभीर जखमी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. जखमींमध्ये एका महिलेचा समावेश आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्यात बांधकाम व्यावसायिक, लेबर कॉन्ट्रॅक्टर, सेंट्रींग कॉन्ट्रॅक्टर यांच्या विरोधात बीएनएस कलम १२५, १२५ अ, १२५ ब अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ९ एप्रिल रोजी रात्री साडेआठच्या सुमारास कैलास पार्क या नवीन इमारतीच्या नवव्या माळ्याचे स्लॅब भरण्याचे काम सुरू होते. लेबर कॉन्ट्रॅक्टर, बांधकाम व्यावसायिक यांनी या ठिकाणी पुरेशी विजेची व्यवस्था न केल्यामुळे आणि सेंट्रींग काम व्यवस्थित नसल्याने येथील स्लॅब कोसळला. यावेळी तिसऱ्या मजल्यावर असलेल्या जाळीवर सात कामगार पडल्याने ते गंभीर आणि किरकोळ जखमी झाले. यावेळी या कामगारांना आवश्यक सुरक्षिततेची साधने, हेल्मेट, सेफ्टी बेल्ट न दिल्याने ते जखमी झाले आहेत. जखमींना वाल्मीक नगर येथील तरुणांनी ताबडतोब रुग्णवाहिकेच्या सहाय्याने उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल केले. घटनास्थळी पनवेल शहर पोलीस तसेच अग्निशामक दलाचे जवान दाखल झाले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक संजय अस्पतवार करत आहेत.



## राष्ट्रवादी काँग्रेच्या सुधाकर घारे यांचे कार्यकर्ता संवाद निमित्ताने शक्ती प्रदर्शन

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**
**दिनांक ९ एप्रिल २०२५ रोजी**

कर्जतमध्ये कार्यकर्ता संवाद कार्यक्रमाच्या निमित्ताने अपक्ष लढलेल्या सुधाकर घारे यांचे प्रभावी शक्ती प्रदर्शन झाले. राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ,नाशिक इगतपुरी चे आमदार हिरामण खोसकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

मंत्री नरहरी झिरवळ यांनी कर्जत येथील पक्ष प्रवेशाच्या सोहळ्यात त्याच्या कडे असलेल्या अन्न व औषध खाते विषद करताना त्याबाबत एक सल्लाही दिला अन्न हे औषध म्हणून खावा अन्यथा औषध अन्ना प्रकाने खावे लागेल. उदाहरणं देताना त्यांनी डायट आणि डॉक्टर च्या गोळ्या विषयी माहिती दिली.
गुढीपाडव्याला लागणार प्रचंड प्रमाणतील श्रीखंड, ईद लागणार मोठया प्रमाणतील दूध संपूर्ण राज्यात मागणी वाढते, ती पुरवलीही जाते तरीही सामान्यांना लागणारे दूध कमी पडत नाही, मग जास्तीच दूध येते कुठून असा त्यांनी प्रश्न उपस्थित केला..??

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष व खासदार सुनील तटकरे मंचावर बसले असताना त्यांना उत्पन्नाच्या अट शिथिल करून २१ हजाराहून ५० हजार करावी कारण हल्ली गोरगरीबनाही २१ हजार पेक्षा जास्त उत्पन्न आहे.५० हजार अट केल्याने जास्त गरिबांना त्याचा लाभ भेटेल असे ही झिरवळ म्हणाले. माजी ज़िल्हा परिषद उपाध्यक्ष व राष्ट्रवादीचे नेते सुधाकर घारे यांच्या सह पक्ष प्रवेश करणारे कार्यकर्ते, पक्षाचे कार्यकर्ते मोठया प्रमाणात उपस्थित होते.हजारो कार्यकर्त्यांना मानसिक उभारी देणारे सुधाकर घारे यांचे भाषण झाले.अशोक भोपतराव,जेष्ठ नेते भरत भगत प्रवेशकर्ते मनसे नेते सचिन कनृक यांनी देखील प्रभावी मनोगत मांडले. यावेळी रॉयल गार्डन कर्जत येथे सभेला महिला पुरुष यांची अफाट गर्दी होती,







## न्हावा गावदेवीची भव्य यात्रा १३ एप्रिलला

### गावक-यांकडून जय्यत तयारी;यात्रेचा लाभ घेण्याचे अशोक भोईर यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई(शांत्ताराम गुडेकर )**

देवाप्रति श्रद्धा ज्यांच्या मनात वास्तव्य करते अशा व्यक्तीना आपण आस्तिक म्हणून ओळखतो,खरे पाहिले तर मनात भाव व देवापरी भक्ती मनापासून जोपासली तर मनुष्याच्या ह्दयातच देवाचे स्थान आहे.असे म्हटले जाते.या बाबी श्रद्धाळू माणसांना पटण्याजोगा नसतात. म्हणूनच ते जेथे देवाचे मंदिर आहे तेथेच देव दर्शनाला जातात.देशभरात अनेक तीर्थक्षेत्र आहेत.त्यातही महाराष्ट्रात तिर्थक्षेत्रांची विशेष परंपरा लाभलेली आहे. या परंपरेनुसार विविध ठिकाणी जागृत देवस्थाने आहेत त्यापैकी जे.एन.पी.टी बंदर घारापुरी (एलिफंटा लेणी) ंच्यामधील न्हावा नावाचे गाव आहे.न्हावा गावामधील मंदिर महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे. या गावाधील गावदेवीची यात्रा चैत्र शुद्ध कृष्ण पक्ष-१ रविवार दि.१३ एप्रिल २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे.तसेच पालखी सोहळा सोमवार दि.१४ एप्रिल २०२५ रोजी होणार आहे.गावामधील ग्रामस्थांनी जत्रेची विशेष तयारी झाली आहे.ग्रामसुधारक मंडळ न्हावे कमिटीचे श्री. विजेंद्र गणेश पाटील (सरपंच),शैलेश



विठ्ठल पाटील (उपसरपंच),योगेश कुंडलीक पाटील (अध्यक्ष),जयेंद्र जनार्दन पाटील (उपाध्यक्ष),निलेश हरिश्चंद्र भोईर (उपाध्यक्ष),विनोद एकनाथ पाटील (उपाध्यक्ष),सतीष दत्ताराम भोईर (उपाध्यक्ष), प्रेमनाथ नामदेव म्हात्रे (खजिनदार),अनंत लहु म्हात्रे (सहखजिनदार),चंद्रकांत बालाराम पाटील (सहखजिनदार),सदानंद पाटील - (सहखजिनदार),मनोरथ लक्ष्मण कडू - (सहखजिनदार)आणि सदस्य, सभासद तसेच संबंधित अन्य पदाधिकऱ्यांनी यांनी विशेष मेहनत घेतली आहे.तसेच पालखी सोहळ्यांसाठी मुंबई,ठाणे व पनवेल तसेच उरण तालुक्यातील आगरी-कोळी बांधवाची मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.गावदेवीचे देऊळ गावकऱ्यांच्या सहभागाने बांधण्यात आले आहे.ही देवी नवसाला पावते म्हणून महाराष्ट्र व परराज्यातूनही अनेक भाविक येथे दर्शनाला येतात.गावदेवीची प्रसन्न व लोभसवाने रुप प्रत्येक भक्ताने एकदा तरी डोळे भरून पहावे.असे आवाहन पंचरत्न मित्र मंडळाचे अध्यक्ष अशोक दामू भोईर यांनी केले आहे.

## शिवसेनेचे दबंग जिल्हाप्रमुख महादेवजी ठाकरे यांच्या उपस्थित वाघी येथील शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश (शिंदे गट)

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा/प्रतिनिधी**
**करण धोंगडे**

शिवसेना पक्षाचे मुख्य नेते तथा माजी मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांनी केलेल्या कामावर विश्वास ठेवून शिवसेना नेत्या वाशिम जिल्ह्याच्या रणरागिनी अपराजित माजी खासदार तथा आमदार भावनाताई गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना वाशिम जिल्ह्याचे दबंग जिल्हाप्रमुख महादेवरावजी ठाकरे यांच्या नेतृत्वात वाघी येथील शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना (शिंदे गट) पक्षात जाहीर प्रवेश केला आहे,यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख संजय भुतेकर,शिवसेना उपतालुकाप्रमुख तथा पंचायत समिती सदस्य नंदू भाऊ देशमुख,शिवसेना महिला आघाडी तालुका अध्यक्ष संध्याताई सरनाईक, दिनकरराव सदार,गोवर्धन सर्कल प्रमुख गजानन सरनाईक,उपसर्कल प्रमुख एकनाथराव आढाव, उपप्रमुख गणेश अंभोरे,परमेश्वर राऊत, अमृता हरीमकर, डॉ.सुभाषराव डांगे,भागवत टेकाळे,रामकिसन खरात,नितीन डोंगरदिवे, न्यू पैलवान नारायण मामा शेवाळे,महादेव लामने,कासम भाई दुकानदार, विजय लामने यांच्यासह गावकरी मंडळीची मोठ्या संख्येने उपस्थिती होती,शिवसेना जिल्हाप्रमुख महादेव ठाकरे यांनी आपल्या भाषणातून विविध समस्या, सर्वसामान्य नागरिकांच्या ,विद्यार्थी वर्गाच्या अडचणी यावर आवर्जून प्रकाश टाकला, या सर्वांचे समस्या निराकरण करण्यासाठी किंवा सोडवण्यासाठी शिवसेना समर्थ असल्याचीही यावेळी ठाकरे यांनी सांगितले यावेळी सरपंच सरोदे पाटील,शेख शाहीर यांचा सत्कार करण्यात आला,या कार्यक्रमाचे आयोजन माधवराव खरात यांनी केले तर सूत्रसंचालन सिद्धार्थ भालेराव यांनी केले.



## जिल्हा परिषद यवतमाळसमोर शिक्षकांचे बेमुदत साखळी उपोषण सुरू

### आंदोलनाचा आज दहावा दिवस । शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांकडून पाठिंबा । न्याय न मिळेपर्यंत माघार नाही – प्रा.पंढरी पाठे यांचा निर्धार

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**
**यवतमाळ:- (दि.१०) एप्रिल**

जिल्हा परिषद यवतमाळसमोर दिनांक १ एप्रिलपासून शिक्षक संघटनांच्या वतीने बेमुदत साखळी उपोषण व धरणे सत्याग्रह सुरू आहे.शिक्षकांच्या प्रलंबित पदोन्नती,विषय शिक्षक वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करणे,तसेच विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख,व मुख्याध्यापक पदोन्नती या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.
आज आंदोलनाचा दहावा दिवस असून, उपोषणकर्त्यांमध्ये विलास राठोड,प्रकाश बावणे,विठ्ठलदास आरू,संजय बिहाडे, विजय मेश्राम,ओंकार राठोड,भगवान आमटे व ज्ञानेश्वर मंडवाल यांचा समावेश होता.




शिक्षक संघटनांनी यापूर्वीही विविध वेळा निवेदने सादर करून मागण्यांकडे लक्ष वेधले होते.२० जानेवारी २०२५ रोजी एकदिवसीय धरणे आंदोलनही करण्यात आले होते.त्या वेळी आमदार बाळासाहेब मागूळकर यांच्या उपस्थितीत प्रशासनाने १० फेब्रुवारीपर्यंत मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते.मात्र,अद्याप ठोस कार्यवाही न झाल्याने पुन्हा एकदा आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे.

**मुख्य मागण्या:**
विषय शिक्षकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करून सेवाजेष्ठ शिक्षकांचा समावेश करणे.
उर्दू माध्यम विषय शिक्षकांचे आदेश ५ एप्रिल २०२५ पर्यंत काढणे.
विस्तार अधिकारी पदोन्नती प्रक्रिया ५ एप्रिल २०२५ पर्यंत पूर्ण करणे.
केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी सेवाजेष्ठता यादी ३ एप्रिल २०२५ पर्यंत प्रसिद्ध करणे व १५ एप्रिलपर्यंत समुपदेशन घेणे.
माध्यमिक शिक्षक,उच्च श्रेणी मुख्याध्यापक, उच्च माध्यमिक शिक्षक व विस्तार अधिकारी (श्रेणी-३, वर्ग-३) यांच्या माध्यमनिहाय यादी तातडीने प्रसिद्ध करणे.
३१ मार्चपर्यंत मागण्या मान्य न झाल्याने १ एप्रिलपासून बेमुदत साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे.प्रशासनाने यावर तातडीने निर्णय घ्यावा,अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल,असा इशारा शिक्षक संघटनांनी दिला आहे. आजच्या दिवशी शेतकरी चळवळीतील कॉम्रेड सचिन मनवर,कृष्णा पुसनाके, विद्या परचाके,इत्यादी कार्यकर्त्यांनी उपोषणास पाठिंबा दर्शवला.यावेळी प्रा.पंढरी पाठे यांनी "न्याय न मिळेपर्यंत उपोषण मागे घेणार नाही," असा ठाम पवित्रा घेतला. यावेळी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेंद्र वेरुळकर,किरण मानकर,उद्धव घोडे,देव डेबरे,सचिन गायकवाड,दिनेश शिंदे,गजानन ढोले,विद्या राऊत,शिल्पा काळे,प्रीती स्थूल,अनुराधा कराळे,महेश खोडके,कैलाश गव्हाणकर,अरुण महल्ले,राजू शिरभाते,संजय कुकडे,नदीम पटेल,गणेश साबापुरे आदी उपस्थित होते.

## अवैध जुगार अड्यावर रिसोड येथे पोलिसांची धाड ५ लाख १६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त १८ वर कारवाई..

### {रिसोड पोलिस ॲक्शन मोडवर.}

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा वाशिम/प्रतिनिधी**
**गजानन पवार**

रिसोड शहरातील वाशिम मार्गावर अवैधरित्या सुरू असलेल्या विघ्नहर्ता क्लब वर रिसोड पोलिसानी धाड टाकून १८ जणांना ताब्यात घेऊन त्यांचा विरोधात कारवाई सदर आरोपीकडून ५ लाख १६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर कारवाई नंतर अवैध रित्या क्लब चां चालवणाऱ्यांचे धाबे दणाणले असून एकच खळबळ उडाली आहे. याबाबत रिसोड पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार रिसोड पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की रिसोड शहरातील वाशिम मार्गावर खडसे कॉलेज समोर विघ्नहर्ता क्लब चे लायसन धारकयांनी शासनाने ठरवून दिलेल्या अटी व शर्ती नियमांचे उलघन करुन अवैध रित्या बंद जागेत तिन तास पते तिरट च हार जीत जुगार खेळवला आहे. या



आधारे रिसोड पोलिस स्टेशन चे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलिस उपनिरीक्षक शिव चरण डोंगरे, यानी आपल्या कर्मचाऱ्यासह सदर ठिकाणी पाहणी केली असता खडसे कॉलेज समोरील बिल्डिंग मध्ये विघ्नहर्ता क्लब मध्ये रेड केली असता बिल्डिंग मध्ये प्रथम रुम १० बाय १० मध्ये १ टेबल भोवती १० इसम तिन पते टिरत हा खेळ खेळत असताना मिळून आले. प्रत्येक इसमा समोर तिन पते टेबल वर दिसून आले. या ठिकाणीं विजय किशनराव मोरे, रा कवठा मधुकर हरिभाऊ भिंगे, रां हराळ, माधव कऱ्हाले रा सुकळी, सागर तुरुकमने रा हराळ, गजानन चरहाटे रा रिसोड, महादेव लांडगे रा रिसोड, श्याम चव्हाण रा रिसोड, शालिक्रम मोरे रा रिसोड, शिवाजी इरतकर, शेख राजिक शेख सादीक, अतिश तुरुकमने, नागो तनपुरे, भगवान मानकर, कमल किशोर इंडोरा, लक्ष्मण अश्रुजी, या सर्वांची अंग झडती तून नगदी २२.७००रू रोख रक्कम मिळून आले. व ५ मोबाईल ५०,०००,असा एकूण ७२,७००, रू चां मुद्देमाल मिळून आला. तसेच काउंटरवर गजानन फाजगे, भगवान आगलावे, मदन शिरसाळ, रिसोड क्लब मध्ये देख रेख करीत असतांना मिळून आले. तसेच नमूद नोदवही हि प्रमाणित दिसून आली नाही. घटना स्थळावरून नमूद आरोपीच्या ताब्यात असलेल्या ७ मोटार सायकल असा एकूण ३,५०,०००, रू चां मोटार सायकल चां मुद्देमाल मिळून आला. सदर इसम हे त्यांना शासनाने ठरून दिलेल्या अटी व शर्ती नियमांचे उल्हंघन करूनअवैध रित्या बंद जागेत तिन तास पते, हार जीत चां जुगार खेळत असताना प्रत्यक्ष मिळुन आल्याने त्यांच्या कडून व घटना स्थळवरून एकूण ५१६२००, रू मुद्देमाल मिळून आल्याने पच्यासमक्ष स्वतंत्र पंचनामा करून ताब्यात घेतला आहे.सदर आरोपीच्या विरोधात कलम ४,५ म, जु, का, सह कलम १३१,म,पो,का,प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर कारवाइ पोलिस हवालदार अनिल राठोड, विनोद धनवट,रवी अडागडे,परमेश्वर भोने, यांनी केली.

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती तालुका शाखा रोहा नूतन कार्यकारणी जाहीर..

**दैनिक युवक आधार**
**रोहा/रायगड**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा रायगड यांच्यावतीने आयोजित केलेल्या रोहा तालुका नूतन कार्यकारणी निवड सभेत राज्य कार्यकारणी सदस्य अनिल नागोठकर , रायगड जिल्हाध्यक्ष विजय येलवे सर,जिल्हा उपाध्यक्ष यशवंत मोंढे , जिल्हा कार्यालयीन चिटणीस भास्कर लेंडी , माणगाव तालुकाध्यक्ष सखाराम कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती तालुका शाखा रोहा येथे नूतन कार्यकारणी संदर्भात सभा संपन्न झाली . नूतन कार्यकारणी सभे दरम्यान रोहा तालुक्यातील इतर संघटनेतील पदाधिकारी व सभासदांनी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती तालुका शाखा रोहा संघटनेत प्रवेश केला.

सदर सभेस उपस्थित असलेले राज्य पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी यांच्या सर्वांनुमते सर्वांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा रोहा नूतन कार्यकारणी अध्यक्षपदी ब्रिजेश बाळकृष्ण भादेकर ,उपाध्यक्षपदी संतोष खलापकर , उपाध्यक्षपदी किशोर पोळेकर , उपाध्यक्षपदी



विजय धोत्रे , सरचिटणीस पदी संजय माधवराव बागडे , कार्याध्यक्षपदी विजय तुकाराम वेळे , कोषाध्यक्षपदी जयेश भोईर , कार्यालयीन चिटणीसपदी संतोष धोत्रे , प्रसिद्धी प्रमुख संतोष वेटकोळी ,तालुका संघटक निवास थळे , शिक्षक समिती महिला आघाडी प्रमुख विद्या रोहेकर , रोहा तालुका महिला आघाडी प्रमुख वैशाली सलागरे , महिला उपाध्यक्षपदी अरुणा लाड ,महिला उपाध्यक्षपद मनिषा पाबरेकर , महिला उपाध्यक्षपदी लीना सुर्वे महिला संघटक वैशाली वेळे आदि शिक्षकांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती तालुका शाखा रोहा नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष विजय येलवे व राज्य कार्यकारणी सदस्य अनिल नागोठकर व उपस्थित जिल्हा व तालुका पदाधिकारी यांनी नूतन कार्यकारिणीचे अध्यक्ष, सरचिटणीस व पदाधिकारी यांचा यथोचित सन्मान करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

द•ख•ल

## विचुंबे येथे आरोग्य शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: रायगड जिल्हा परिषद शाळा, विचुंबे येथे जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरामध्ये ० ते ५ वर्ष वयोगटातील बालके तसेच गरोदर मातांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबिरामध्ये प्रमोद भिंगारकर, सरपंच विचुंबे ग्रामपंचायत, बळीराम पाटील, माजी सरपंच, श्रावणी भोईर, अध्यक्ष महिला आणि बालकल्याण समिती विचुंबे ग्रामपंचायत डॉ. मंगेश पाटील ,सहसंचालक
डॉ. डी.एम. थोरात, संचालक, डॉ.अपर्णा पवार-खेडेकर, तालुका आरोग्य अधिकारी, सायली मानकर ,वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली डॉ.ऋषिकेश वडके, संस्थाप्रमुख सत्यसाई संजीवनी हॉस्पिटल खारघर, डॉ.सारिका म्हात्रे, स्त्रीरोग तज्ञ डॉ.सुचित्रा सुर्वे, बालरोगतज्ञ इमपीएच आणि एसएचआय विद्यार्थी सत्यसाई संजीवनी हॉस्पिटल हेल्थ स्टाफ, एनआयपीएच टीआर हेल्थ स्टाफ,
तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय हेल्थ स्टाफ,
प्राथमिक आरोग्य केंद्र आजिवली हेल्थ स्टाफ उपस्थित होते. या शिबिरामध्ये सहभाग घेण्यासाठी लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, सदर शिबिरामध्ये ९० लाभार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी ग्रामपंचायत विचुंबेचे यांचे सहकार्य लाभले.




## नागोठणे नगरीत महावीर स्वामी जन्म कल्याणक उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

जैन समाजाच्या वतीने श्री महावीर स्वामी जन्म कल्याणक गुरुवार 10 एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सकाळी महावीर स्वामीची वाजत गाजत, भजन करीत पालखी काढण्यात आली. सदरील श्री चंद्रप्रभ स्वामी जैन मंदिरातून निघालेली पालखी छत्रपती शिवाजी महाराज बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौकातून ग्रामपंचायत कार्यालयात पालखी आल्यानंतर सरपंच सुप्रिया संजय महाडीक,उपसरपंच अकलाक पानसरे,मा. सरपंच डॉ.मिलिंद धात्रक, ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, ग्रा.पं. सदस्या भाविका गिजे,मा.ग्रा.पं.उपसरपंच सुरेश जैन,ग्राम विकास अधिकारी राकेश टेमघरे यांनी पालखीचे स्वागत करून पूजन केले. त्यानंतर पालखी गांधी चौक मार्गे मंदिरात नेण्यात आली. या धार्मिक कार्यक्रमात जैन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोटरसायकल झाडाला धडकल्याने 38 वर्षीय इसमाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



: निष्काळजीपणाने मोटरसायकल चालवल्याने मोटरसायकल झाडाला धडकली. आणि 38 वर्षीय प्रशांत प्रकाश जाधव (राहणार कांबे, मोहोपाडा) यांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

९ एप्रिल रोजी सकाळी सव्वा सहाच्या सुमारास प्रशांत प्रकाश जाधव हे मुंबई पुणे हायवे पुणे लेनवरून बारवईकडून समता नगरकडे मोटरसायकल क्रमांक एम एच ४६ बीएस १०६३ घेऊन जात होते. ते निष्काळजीपणे मोटरसायकल चालवत बारवई गावच्या पुढे तालीब अँड श्यामसी कंपनीच्या समोर बारवाई येथे आले असता त्यांची मोटरसायकल झाडाला धडकली. यात ते गंभीर जखमी झाले. आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# गावाचा सर्वांगीन शाश्वत विकासा करीता गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांनी घेतले गाव दत्तक

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** दिनांक 10 एप्रिल 2025 रोजी ग्रामपंचायत वांगी बुद्रुक येथे गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांच्या प्रमुख उपस्थितीत व सरपंच ज्योती बापूराव काकडे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व गावकऱ्यांची बैठक घेऊन एकात्मिक शाश्वत ग्राम कार्यक्रमांतर्गत गावाचा सर्वांगीन शाश्वत विकास करण्यासाठी सिल्लोड तालुक्यातील ग्रामपंचायत वांगी बुद्रुक व मोढा खुर्द ही दोन्ही गावे गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांनी दत्तक घेतली गावातील नागरिकांची प्राथमिक बैठक घेऊन गाव विकासासाठी जास्तीत जास्त लोकांनी सहकार्य करावे अशा बैठकीत सूचना दिल्या त्यानंतर गाव पाहणी करण्यात आली सद्य स्थितीत गाव कसे आहे व गावात आणखीन शाश्वत



विकासासाठी काय काय करावे लागणार याबाबत माहिती घेतली .भारतीय हे ग्रामीण भागात वास्तव्य करतात, खरा भारत हा ग्रामीण भागात पाहायला मिळतो. विविध बोली भाषा, संस्कृती, चालीरिती, रुढी, परंपरा या प्रामुख्याने ग्रामीण भागात आजही जपलेल्या दिसतात. ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे योगदान हे अत्यंत महत्वाचे आहे. राज्यामधील विकासाच्या सर्व योजना या पंचायत राज संस्थांमार्फत राबविल्या जातात. त्यामुळे पंचायत राज संस्थांची ग्राम विकासातील भूमिका ही अत्यंत महत्वाची आहे. पंचायत राज संस्थांमध्ये निवडून येणारे लोकप्रतिनिधी तसेच ग्रामविकासामध्ये काम करणारे अधिकारी या दोहोंच्या समन्वयातून, कल्पकतेतून, गावामध्ये राहणाऱ्या सर्वच नागरिकांच्या विधायक प्रयत्नांतुन गावे ही सुजलाम, सुफलाम होणे, स्वंयपूर्ण होणे अपेक्षित आहे. यामध्ये ग्रामविकास विभागातील अधिकाऱ्यांची भूमिका महत्वाची भूमिका दर्शविते.

प्रत्येक महाराष्ट्र विकास सेवेतील अधिकाऱ्यांच्या मार्फत या विभागामध्ये एकात्मिक शाश्वत ग्राम कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याबाबत विभागातील गावाची निवड करण्यात आली.

**उपक्रमाचे उद्दिष्ट :-**

१. गावाचा सर्वांगिण शाश्वत विकास करणे,
२. गावाच्या विकासात गावकऱ्यांचे योगदान घेणे,
३. महाराष्ट्र विकास सेवेतील अधिकाऱ्यांचे गाव विकासामध्ये प्रत्यक्ष योगदान घेणे, इतर गावांना प्रेरणादायी व आदर्श अशा ग्रामाची निर्मिती करणे.
४. एकात्मिक शाश्वत ग्रामाची निर्मिती करणे,

उपरोक्तप्रमाणे उद्दिष्टे विचारात घेऊन कार्यक्रमाच्या रुपरेषेप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करीत असतांना विविध विभागांतर्गत सुचविण्यात आलेली विकास कामे ही केवळ मार्गदर्शक असुन यामध्ये आपल्या कल्पकतेची भर घालुन उपक्रम अधिकाधिक प्रभावी होईल व गाव अधिक समृद्ध होईल यावर लक्ष केंद्रित करणार आहे. हे करत असतांना विविध विभागांतर्गत विकास कामांसाठी संबंधित कामाच्या अनुषंगाने शासन निर्णयान्वये दिलेल्या सुचनांचे तंतोतत पालन करत व गावामध्ये विविध समित्यांची स्थापना करून प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यावेळी विस्तार अधिकारी आरोग्य समाधान जाधव, स्वच्छ भारत मिशन गट समन्वयक केशवकांत बुलबुले, ग्रामपंचायत अधिकारी लीलाधर कोळी, गावातील प्रतिष्ठित नागरिक आजी माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कामोठे येथील रामशेठ ठाकूर विद्यालयाला आयएसओ मानांकन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी )**



रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजला आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. विद्यालयाच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांनी हे प्रमाणपत्र स्वीकारले. दरम्यान, या यशाबद्दल संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले. विविध उपक्रमांमध्ये नेहमीच अग्रेसर असणाऱ्या विद्यालयाच्या शिरपेचात आयएसओ मानांकनाने मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांची प्रगती व सर्वांगीण विकास हाच ध्यास असणाऱ्या या विद्यालयातील शैक्षणिक व इतर उपक्रम, भौतिक सुविधा, स्वच्छ व पोषक वातावरण या साऱ्याची दखल घेऊन हे मानांकन प्राप्त झाले आहे. वर्ष २०२५चे आयएसओ ९००१:२०१५ क्वालिटी मॅनेजमेंट सिस्टिमचे हे मानांकन प्रमाणपत्र किंगबर्ड कन्सल्टन्सीचे डायरेक्टर विजय नाळे तसेच ऑडिटर प्रमोद मांडवे यांच्या सहकार्याने मिळाले. गुणवत्तेच्या निकषातून प्राप्त झालेल्या आयएसओ मानांकनाने विद्यालयात आनंदाचे वातावरण पसरले आहे. या बहुमानाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह विद्यालयाचे चेअरमन व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख यांनी विद्यालयाच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, सहकारी शिक्षक, कर्मचारीवृंद यांचे विशेष अभिनंदन केले. या वेळी संस्थेचे रायगड विभाग पीआरओ बाळासाहेब कारंडे, लोकनेते रामशेठ पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, पर्यवेक्षिका सारिका लांजूरकर, प्रियांका बांगर आदी उपस्थित होते.

## मराठा सेवा संघ संचलित जिजाऊ रथ यात्रेच उमरीत सार्वजनिक स्वागत, तसेच व्हीपीके उद्योग समूहाच्या वतीने अन्नदानाच नियोजन



**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -** उमरी मराठा जोडो अभियान ह्या रथ यात्रेचा प्रारंभ शहाजी गढी वेरूळ ते समारोप लाल महाल पुणे येथे युग पुरुष पुरुषोत्तम खेडेकर, साहेब यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आली आहे. ही रथ यात्रा नायगाव मार्ग उमरी येथे मोंढा मैदान छत्रपती शिवाजी महाराज पुतळया समोर आली असता व्हीपीके उद्योग समुहाच्या वतीने खिचडी,ज्यूस, पाणी फराळचे नियोजन मारोतराव कवळे गुरुजी यांनी जीजाउ रथ यात्रेचे जंगी स्वागत केले ह्या रथ यात्रेत शिवश्री विजय तनपुरे सर मराठा सेवा संघ,कार्यकारी अध्यक्ष शिवश्री, सौरभ खेडेकर संभाजी ब्रिगेड महाराष्ट्र सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली चालत आहे. यावेळी उमरी शहरातील असंख्य मान्यवर उपस्थित होते यावेळी संजयजी कुलकर्णी साहेब माजी नगराध्यक्ष उमरी, सुभाषजी पेरेवार शिवसेना, सुभाषराव देशमुख गोरठेकर, पारसमल दर्डा रेल्वे कृती समिती, माजी संचालक वसंतराव जाधव,श्रीनिवासराव ढगे उमरी तालुका अध्यक्ष मराठा सेवा संघाचे बेंद्रे सर, व्हीपीके उद्योग समूहाचे सीईओ संदीप पाटील कवळे,युवा नेते गोविंद पाटील ढगे युवा नेते राजेश ढगे, योगेश पाटील मोरे दत्ताहरी पाटील ढगे यांच्यासह असंख्य शिवप्रेमी उपस्थित होते

# श्री ज्योतिर्लिंग देवाच्या यात्रेनिमित्त हिप्नॉटीझम व विद्यार्थ्यांचा गुण गौरव सोहळा २०२५

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन जिंती चा अष्टकपूर्ती समारंभ

गेल्या आठ वर्षांपूर्वी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गावासाठी ज्ञानप्रबोधिनी फौंडेशनचे रोपटे लावण्यात आले. फौंडेशनची संकल्पना ही विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दर्जा उंचवावा यासाठी स्थापण करण्यांत आली.त्यावेळेस माजी विद्यार्थ्यांनी मेळावा घेऊन सर्वानुमते ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन जिंती असे नामकरण करण्यात आले.प्रथमतः प्राथमिक शाळेतून केलेली ही सुरवात आता बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात प्राविण्य मिळवण्यात यश दिसत आहे.जि. प. शाळा जिंती येथे बक्षीस वितरण, शैक्षणिक साहित्याचे शालेय गणवेश वितरण क्रीडा साहित्य व कीट, बाल संस्कार शिबीर




,इत्यादी कार्यक्रम करून एक वेगळा पायंडा पाडून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम फौंडेशन करत आहे. जागतिक तापमान वाढीमुळे पर्यावरण समतोल राखण्यासाठी पर्यावरण पूरक उपक्रम म्हणजे बियरोपन व टाकाऊ पासून टिकाऊ प्लास्टिकचा कमी वापर यासारखे कार्यक्रम यावर्षी राबवले आहेत तसेच समाजचे आपण काही देणे लागतो या हेतूने जिंती पंचक्रोशीतील परिसरात डोंगर टेकड्यांवर एक लाख बियांचे रोपण करण्याचा कार्यक्रम करून काही अंशी निसर्ग संवर्धन करण्याचा प्रयत्न केला.निसर्गापासून आपणास अनेक फायदे मिळतात.अनेक आयुर्वेदिक औषधे तयार केली जातात यासाठी सुद्धा आपण शिबीर यावर्षी घेतले होते.

गावामध्ये *माझे गाव,स्वच्छ गाव* या अभियानांतर्गत गावची स्वच्छता मोहीम सुध्दा राबवली आहे.श्री ज्योतिर्लिंग विद्यालय जिंतीमध्ये पुस्तकांचा संच, विद्यार्थ्यांच्या साठी करिअर मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षेसाठी प्रेरणा देणाऱ्या तज्ज्ञांची व्याख्याने यासारखे कार्यक्रम पार पाडले आहेत. तसेच प्रथम तीन क्रमांक यांना १५ ऑगस्ट रोजी बक्षीस वितरण ,विशेष प्राविण्य मिळवऱ्याना विशेष बक्षीस वितरण करण्यात आले आहे. ज्ञानप्रबोधिनी फौंडेशन जिंती यामध्ये गावातील डॉक्टर, इंजिनिअर,शासकीय सेवेत अधिकारी,पोलीसअधिकारी,पत्रकार,फौंजी,उद्योजक यांचाही यामध्ये समावेश आहे.सर्वजण वार्षिक होणाऱ्या कार्यक्रमात अगदी हिरहिरीने भाग घेऊन सहकार्य करतात. ज्ञानप्रबोधिनी फौंडेशन जिंती व जिंती ग्रामस्थ याच्या संयुक्त विद्यमाने ज्योतिर्लिंग देवाच्या यात्रेच्या निमित्ताने कोल्हापूर येथील सुप्रसिद्ध संमोहन तज्ञ मा.श्री शशांक प्रिष्टे सर यांचा व्यक्तिमत्व विकास यावर आधारित संमोहनाचा कार्यक्रम आयोजित केला असून या कार्यक्रमात यावर्षीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव गावातील ग्रामस्थांच्या व ज्ञानप्रबोधिनी फाउंडेशन जिंतीच्या वतीने करण्यात येत आहे. विविध स्पर्धा परीक्षेत, विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांनी, युवकांनी गावाच्या लौकिकात भर घातल्याने यात्रेचे औचित्य साधून त्यांचा गुणगौरव करताना गावातील सर्व ग्रामस्थ, पालक वर्ग, उपस्थित राहावे असे आवाहन ज्ञानप्रबोधिनी फौंडेशन जिंती यांच्यातर्फे करण्यात येत आहे.

# प्रांताधिकारी हेमांगी पाटील व तहसिलदार विशाल नाईकवाडे यांचे विद्यार्थ्यांना अनावृत्त पत्र

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर :-** सध्या परीक्षांचा हंगाम सुरू असून आगामी सत्रासाठी विविध दाखले काढण्यासाठी विद्यार्थी महसुली कार्यालयात गर्दी करतात, मात्र कोणत्या दाखल्यासाठी कोणते कागदपत्रे हवीत याचे विद्यार्थ्यांना व्यवस्थित मार्गदर्शन मिळत नसल्याने काही त्रुटीमुळे विद्यार्थ्यांना दाखले मिळण्यास अडचण येते. काहीवेळा दाखल्याअभावी नाववर्षात प्रवेशासही मुकावे लागते. त्यामुळे निफाडच्या उपविभागीय अधिकारी हेमांगी पाटील, तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी सामाजिक माध्यमात विद्यार्थ्यांना अनावृत्त पत्र लिहून कागदपत्रांची जंत्रीच जाहीर केल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय दूर होणार आहे. विद्यार्थी मित्रांनो, नुकत्याच दहावी व बारावी च्या परीक्षा संपल्यात, पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशास अद्याप थोडा अवधी आहे. अनेकदा शालांत परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याच्या काळात आवश्यक दाखले काढण्यासाठी विद्यार्थी - पालकांची झुंबड उडते. या दाखल्यांसाठी येणाऱ्या अर्जांचे प्रमाण प्रचंड वाढल्याने प्रशासनावर अतिरिक्त ताण येतो आणि विद्यार्थ्यांनाही वेळेत दाखले मिळण्यात अडचणी येतात. वादविवाद - भांडणाचे प्रसंगही उद्भवतात, असा अनुभव आहे. अनेकदा दाखले मिळाल्यास प्रवेशाच्या संधी हुकण्याची भीती निर्माण होते; तसेच अनेकदा प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले

तहसीलदार साहेब




**विशाल नाईकवाडे साहेब**

न मिळाल्याने त्यांचे प्रवेश रद्द करण्याचीही वेळ येते. त्यामुळे प्रवेशास कालावधी असताना आताच दाखले काढून घेतल्याने भविष्यात होणारी धावपळ नक्कीच कमी होणार. सोबतच प्रमाणपत्रांसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करावी.

आर्थिक दृष्ट्या मागास (राज्य सरकार) - अर्जदाराचा शाळा सोडल्याचा दाखला, बोनाफाईड प्रमाणपत्र / जन्माबाबतचे प्रमाणपत्र, अर्जदाराचे आधारकार्ड, रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड, विज बील किंवा सातबारा, वडील / आजोबा यांचा शाळा सोडल्याचा दाखला, वडिलांचा तहसीलदार यांचा 3 वर्षाचा उत्पन्न दाखला, डोमासाईल प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र रहिवास प्रमाणपत्र - शाळा सोडल्याचा दाखला / बोनाफाईड प्रमाणपत्र जन्माबाबतचे प्रमाणपत्र, अर्जदाराचे आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड, विज बील किंवा सातबारा, वय, राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र, विवाह झाला असेल तर विवाह प्रमाणपत्र, मुलगा / मुलगी लहान असेल तर रहिवास

जातीचा दाखला - अर्जदाराचा शाळा सोडल्याचा दाखला, अर्जदार यांचे वडील आजोबा पणजोबा यांचा शाळा सोडल्याचा दाखला, अर्जदार याचे आधार कार्ड, एस.सी, एस.टी. जात प्रमाणपत्र साठी सन १९५० पूर्वीचा पुरावा निफाड उपविभागातील आवश्यक आहे. एन.टी, व्ही.जे जात प्रमाणपत्र साठी सन १९६१ पूर्वीचा पुरावा निफाड उपविभागातील आवश्यक आहे. ओबीसी, एसबीसी जात प्रमाणपत्रसाठी सन १९६७ पूर्वीचा पुरावा निफाड उपविभागातील आवश्यक आहे.

मराठा जात प्रमाणपत्र साठी सन १९६७ पूर्वीचा पुरावा निफाड उपविभागातील आवश्यक आहे. मराठा जातप्रमाणपत्र आणि नॉन क्रिमीलेअर - अर्जदाराचा बोनाफाईड / शाळा सोडल्याचा दाखला, वडिलांचा शाळा सोडल्याचा दाखला, आजोबांचा शाळा सोडल्याचा दाखला, दिलेल्या नमुन्यात वंशावळ प्रतिज्ञापत्र, शपथपत्र, घोषणापत्र, एक वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र, मुलगा/मुलगी लहान असेल तर रहिवास पुरावा. ३० टक्के महिला आरक्षण - अर्जदार यांचे शाळा सोडल्याचा दाखला बोनाफाईड प्रमाणपत्र / जन्माबाबतचे प्रमाणपत्र, अर्जदाराचे आधार कार्ड, रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड, विज बील किंवा सातबारा, वडील / आजोबा यांचा शाळा सोडल्याचा दाखला, तहसीलदार यांचा 3 वर्षाचा वडिलांचा उत्पन्न दाखला, प्रतिज्ञापत्र वय, राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र - शाळा सोडल्याचा दाखला / बोनाफाईड प्रमाणपत्र (जन्म गाव तालुका जिल्हा असणे आवश्यक आहे) जन्माबाबतचे प्रमाणपत्र, अर्जदाराचे आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड विज बील किंवा सातबारा.मुलगा/ मुलगी लहान असेल तर रहिवास पुरावा.

शेतकरी व अल्पभूधारक - शेतकरी असल्याचे प्रतिज्ञापत्र, चालू सातबारा उतारा, चालू खाते उतारा, आधार कार्ड, रेशन कार्ड, प्रतिज्ञापत्र, मंडळ अधिकारी चौकशी अहवाल, मुला/मुलीसाठी आवश्यक असल्यास त्यांचा आणि वडिलांचा शाळा सोडल्याचा दाखला.

उत्पन्न दाखला - स्वयंघोषणापत्र, आधार कार्ड, रेशन कार्ड, सरकारी नोकरीस असेल तर फॉर्म १६ आवश्यक.

नॉन क्रिमियर प्रमाणपत्र - अर्जदाराचा शाळा सोडल्याचा दाखला, अर्जदाराचा जातीचा दाखला, अर्जदाराच्या वडिलांचा ३ वर्षाचा तहसीलदार यांचा उत्पन्न दाखला, अर्जदाराचे आधार कार्ड, रेशन कार्ड, स्वयंघोषणापत्र.

## पनवेल तालुक्यातील क्षयरोग मुक्त ३२ ग्रामपंचायतींचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत अभियान अंतर्गत ९ एप्रिल रोजी पनवेल तालुक्यातील एकूण ७१ ग्रामपंचायतीपैकी ३२ ग्रामपंचायतींचा सत्कार पंचायत समिती कार्यालय पनवेल येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अपर्णा पवार यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास पंचायत समिती पनवेलच्या विस्तार अधिकारी मीनल कनोजे, वैद्यकीय अधिकारी डॉ.आकाश वावेकर, डॉ प्रभाकर पाटील, डॉ सायली मानकर, डॉ.प्रणव उरणकर, डॉ. अब्दुल करीम रझाक उपस्थित होते. पात्र ३२ ग्रामपंचायतीपैकी ६ ग्रामपंचायती पालेबुद्रुक, खैरवाडी, बारवई, भाताण, जांभिवली, पोसरी या सलग दुसऱ्या वर्षी क्षयरोग मुक्त म्हणून पात्र झाल्या व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या रजत पुतळ्याच्या व प्रशस्ती पत्राच्या मानकरी ठरल्या. उर्वरित २६ ग्रामपंचायती देवळोली, सावळे, गुळसुंदे, कराडे खुर्द, दिघाटी, चिखले, वाकडी, दुंदरे, उमरोली, वाघिवली, तुराडे, नांदगाव, सोमटणे, शिरवली, चिंधरण, केळवणे, पोयंजे, खानाव, मालडुंगी, नितळस, गव्हाण, न्हावा, तरघर, ओवळा, पारगाव, वडघर या ताम्र पुतळ्याच्या व प्रशस्ती पत्राच्या मानकरी ठरल्या. पात्र ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी म्हणून सरपंच ,वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि आशा स्वयंसेविका उपस्थित होते.

डॉ.अपर्णा पवार यांनी सर्व ग्रामपंचायतींचे अभिनंदन केले तसेच येत्या वर्षात सर्व ग्रामपंचायती क्षयरोग मुक्त करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात उत्कृष्ट काम केल्याबद्दल डॉ .आकाश वावेकर( वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र नेरे), डॉ. प्राजक्ता देबाजे (समुदाय आरोग्य अधिकारी उपकेंद्र वलप ), राजाराम चव्हाण ( आरोग्य सहाय्यक नेरे ), स्मिता मढवी (औषधनिर्माण अधिकारी प्रा. आ.केंद्र अजिवली.) आदेश गडग (प्रयोगशाळा तंत्रज्ञ प्रा. आ.केंद्र वावंजे) शेखर घरत (आरोग्य सेवक प्रा.आ केंद्र आपटा), सुलभा गायकर (गट प्रवर्तक गव्हाण), रुक्मिणी कांबळे (आशा स्वयंसेविका गव्हाण) यांचा सत्कार करण्यात आला. तसेच निक्षय मित्र हिंडाल्को इंडस्ट्रीज लिमीटेड तळोजाचे सी. एस. आर. मॅनेजर लहू रौंदळ आणि नंदिनी यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन तालुका आरोग्य सहाय्यक शरद बडे यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय येथील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



# वेटर ते टिचर बापू शिंदे सरांचा प्रेरणादायी जीवन प्रवास

## आदर्श शिक्षक बापू शिंदे यांचा पन्नासावा वाढदिवस

**वाढदिवसाच्या निमित्ताने विशेष**

श्री काळभैरवनाथाच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या मराठवाड्याच्या सरहद्दीवरील बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील सीना नदीच्या तीरावर वसलेले साकत बुद्रुक हे एक छोटेसे गाव. गावची लोकसंख्या जेमतेम १५०० च्या दरम्यान. पश्चिमेला सीना नदी च्या पलीकडे अहिल्यानगर जिल्ह्यातील दहिगाव हे श्रीराम मंदिराचे देवस्थान असलेले गाव. अहिल्याबाई होळकर यांनी श्रीराम देवस्थानचे मंदिर बांधून जीर्णोद्धार केला असे म्हणतात. तर सीना नदीच्या दक्षिणेला पलीकडे अहिल्यानगर या जिल्ह्यातील साकत खुर्द गाव. अशा सिना नदीच्या काठी मराठवाड्याच्या बॉण्ड्री वर असलेल्या साकत तालुका आष्टी या गावी पांडोजी शिंदे चा मुलगा बाबाजी.बाबाजी चा मुलगा कोंडीबा.कोंडीबाचा मुलगा विश्वनाथ. विश्वनाथाला चार मुले मोहनराव, बाबासाहेब, तीन नंबरचा अर्जुन तर चौथा कै.भाऊसाहेब.व मुलगी तुळसाबाई असे पाच दाम्पत्य . विश्वनाथांची पत्नी सोनाबाई ही लवकर देवाज्ञा झाल्यामुळे निधन झाले. पाचही मुले आईपासून पोरकी झाली . मोठा मोहनराव शिकत असल्यामुळे भाकरी घालण्यासाठी विश्वनाथ यांनी मांडवा ता.अहिल्या नगर येथील फकीरा निक्रड यांची मुलगी हौसाबाई हीच्याशी २७/०५/१९७४ रोजी विवाह लावून दिला . बाबा चे लग्न झाल्यामुळे विश्वनाथच्या इतर सर्व लहान मुलांचे संगोपन करण्याची जबाबदारी हौसाबाई हिने अतिशय मन लावून केली. बाबाला सोडून त्यांनी सर्वांना शिकवले. मोहनराव व भाऊसाहेब हे भारतीय सैन्य दलात भरती होऊन देशसेवा करू लागले तर. बाबासाहेब यांनी आपली बहिण तुळसाबाई हीचे लग्न बाळासाहेब कल्हापुरे सर खडंबा यांच्याशी स्वतःचा खर्च करून लावून दिले. अशा अडाणी अशिक्षित सालानी मोल मजुरींनी कुटुंब पोटचालवणाऱ्या बाबासाहेब व हौसाबाई यांच्या पोटी साडेतीन मुहूर्तपैकी एक असणारा गुढीपाडव्याच्या भारतीय मराठी महिन्याची सुरुवात चैत्र शुद्ध प्रतिपदा या मुहूर्तावर सायंकाळी सात च्या दरम्यान एका गोंडस बाळाचा जन्म झाला.ती तारीख होती ११ एप्रिल १९७५. बाळाचे नाव ठेवले बापू. बापूचे पालन पोषण हसाबाई व बाबा यांनी अतिशय गरीब परिस्थितीत केले.लोकांच्या इथे कष्ट करून मोलमजुरी करून बापूला मोठे करत होते. आई सांगते घरी दूध नसल्यामुळे मी रडायला लागलो की आई मला पिठ पाण्यात कालवून ते दूध म्हणून देत होते. आश्या बापूला वाड्यातील सर्वजण श्याम या टोपण नावाने हाक मारत होते. बापू मोठा झाल्यावर त्याला त्याच्या आजोबांनी विश्वनाथ यांनी हाताला धरून फरपटत गावातील साकतच्या जि.प.शाळेत नाव दाखल केले. चिचोंडीचे आब्बास खान सर, खांदवे सर होते. त्यांच्या हाताखाली बापू चे चौथीपर्यंत शिक्षण पूर्ण झाले. बापू चौथीत असताना विश्वनाथ यांनी बाबाला वाटून वायली दिले.कुटुंबाची विभागणी झाली.तीन भाव एकत्र व बाबा वायली झाला निघाले. त्या दिवशी शनिवार होता.बापू शाळेतून घरी आला तर वडिलांचा पसारा दारात मांडलेला होता. आई त्यांना जेवन वाढत होती . ते बापूला म्हणाले तुझे दप्तर आवर ,सर्व भर .आपण आता इथे राहणार नाहीत. सपरात राहणार आहोत. सालानी बाहेर राहाण्यासाठी अमृतराव शिंदे यांच्या गड्यांसाठी असलेल्या सपरात संसार थाटला. वाटण्या झाल्या अडीच एकर जमीन वाट्याला आली. पण बाबानी बहिणीचे लग्न करून दिलेले होते . तिचे कर्ज फेडण्यासाठी सात वर्षे जमीन भावांना खायला दिली. बापू चौथी पास होऊन जीवन शिक्षण मंदिर दहिगाव या जिल्हा परिषद शाळेत दाखल झाला.तेथे बापूचे सातवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. सातवी नंतर बापूला कुठे शाळेत पाठवावे हा प्रश्न वडीलांच्या पुढे निर्माण झाला. गावातील मधुकर भोगाडे सर यांनी वडिलांना बापूला रुईछत्तीचे येथे शाळेत पाठव म्हणून सांगितले. पण रोज जाणे येण्यासाठी एसटीला खर्च येईल तो खर्च आपल्याला परवडणार नाही .एक दिवस रुईला शाळेत पाठवलेल्या बापूला नव्याने शिराढोण येथे सुरू झालेल्या जगदंबा विद्यालय शिराढोण येथे आठवीला दाखल केले .बापूचे इयत्ता आठवी ते दहावीपर्यंत चे शिक्षण जगदंबा विद्यालय शिरढोण येथे झाले. बापूला पायात पहिली चप्पल आठवीला असतांना वडिलांनी घेतली .चार किलोमीटर पायी चालत जायचे व यायचे असा दिनक्रम इथे शाळेत असताना होत होता.दहावीच्या वार्षिक बोर्ड परीक्षा वाळकी तालुका अहमदनगर येथे झाल्या. वाचण्यासाठी बापूला गाईड नव्हते नव्हती .परंतु बापूचा मित्र प्रदीप काशीद हा बापूला अपेक्षित गाईड चे दोन भाग करून अर्धा भाग वाचायला द्यायचा. आलटून पालटून दोघे गाईड वाचायचे. अशापद्धतीने आळीपाळीने वाचून अभ्यास करायचा. प्रदीप काशीद याने बापूला एक मित्र सच्चा मित्र म्हणूनमदत केली.बापू आजही ती मदत विसरत नाही. दहावीची परीक्षा झाली. नंतर दहावीचा निकाल लागला. बापूला ६४.६५% मार्क्स मिळाले .पुढे काय करायचे माहित नव्हते. कोणाचे मार्गदर्शन नव्हते . वडिलांचे साकतचे मित्र दगडू आरूणे यांनी बापूला डी.एड करण्याचा सल्ला दिला होता. कारण त्यांचे भाऊ बाजीराव आरूणे हे प्राथमिक शिक्षक होते. डी.एड म्हणजे काय असते हे बापूला माहित नव्हते, ते कुठे असते, कसे करायचे ,याची पुसटशीही कल्पना नसल्यामुळे त्यांना ऍडमिशन घेता आले नाही.पुढे त्यांनी रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेज अहमदनगर येथे त्यांचे चुलत चुलते सूर्यभान अमृतराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ऍडमिशन अकरावी आर्ट्सला केले.कॉलेजचे प्राचार्य बापूला सायन्सला ऍडमिशन देत होते. चांगले मार्क्स आहेत पुढे त्याचे कल्याण होईल म्हणून ते विनंती करायचे ,परंतु आपण ग्रामीण भागात आलेलो असल्यामुळे शिक्षणाचा खर्च परवडणार नाही, झोपणार नाही म्हणून सायन्सला ऍडमिशन न घेता अकरावी आर्ट्स ला ऍडमिशन घेतले. नगरमध्ये माळीवाड्यात रूम भाड्याने केली .पोपट वाघ व कै.पांडुरंग चितळकर हे नगरला राहून त्यावेळी प्लंबिंग चे काम करायचे त्यांच्या रूम मध्ये मी तिसरा पार्टनर म्हणून राहू लागलो.व कॉलेज करू लागलो. कॉलेज ११ ते ४पर्यंत असायचे सकाळ व संध्याकाळी रिकामा



होता. आमच्या गावातील अनेकांनी कापड बाजारात असलेल्या कै.विष्णूपंत देडगावकर यांच्या मयूर हॉटेलमध्ये काम करून शिक्षण घेतले होते. मला पण आमच्या साकत गावातील मारुती खरात उर्फ बाळू गुरुजी यांनी हॉटेलमध्ये वेटर म्हणून ओळखीने कामाला लावले.सकाळी सात ते दहा पर्यंत हॉटेलमध्ये वेटर चे काम.नंतर१० ते ४ पर्यंत कॉलेज. संध्याकाळी परत पाच ते दहा पर्यंत हॉटेलमध्ये वेटर चे काम असे ,असा दिनक्रम सुरू झाला. अकरावीला प्रवेश झाल्यानंतर केडगावचा बाळासाहेब फटांगरे हा मुलगा माझ्या बेंचवर बसून शिक्षण घेत होतो . त्याचे वडील फौजी होते.आमची चांगली दोस्ती जमली. त्याचा डी.एड ला नंबर लागल्याचे त्यांनी मला सांगितले. मी फटांगरेला डीएड विषयी पूर्ण माहिती विचारली त्याने सविस्तर डीएड ची माहिती दिली. डीएडचे शिक्षण दोन वर्षाचे असते ते झाल्यानंतर शिक्षक म्हणून तुला नोकरी लागेल अशी माहीत दिली.माझी डी.एडची कुतूहल व आवड निर्माण झाली. वाढली. नंतर बापूंनी आयटीआय अकरावी झाल्यानंतर बापूंनी अहमदनगर येथे वेल्डर या कोर्सला ऍडमिशन घेतले. आय टी आय केल्यानंतर कंपनीत नोकरी लागते.त्यामुळे आकरवी पास झाल्यानंतर आयटीआय सुरू केली . हॉटेलमधील वेटरची नोकरी होतेच . मयूर हॉटेलचे मालक कै.विष्णुपंत देडगावकर हे अतिशय देवमाणूस. ते शाळेतील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अतिशय जीव लावायचे . सकाळचा नाष्टा,दोन टाईम जेवण, दोन टाईम चहा,आणि महिन्याला पगार दीडशे रुपये महिना मिळायचा .त्यामध्ये पन्नास रुपये खोलीभाडे व शंभर रुपये इतर खर्चासाठी मिळायचे. साकतला मी आई-वडिलांना उरलेले पैसे द्यायचो.अशात आय.टी.आयला असतानांच महाराष्ट्र शासनाने बारावीनंतर डीएड चा प्रवेश होईल. अभ्यासक्रमाला प्रवेश मिळेल असे जाहीर केल्याची बातयी मी हॉटेलमध्ये येत असलेल्या सकाळ पेपरला त्या वेळी वाचली. आय टी आय झाल्यानंतर मी बारावीला रेसिडेन्शिअल ला पुन्हा जून मध्ये प्रवेश घेतला पण आयटीआय ची परीक्षा देऊन ऑगष्टमध्येच मी कॉलेजला गेलो. रेसिडेन्शियल चे पर्यवेक्षक असलेले इतिहास शिकवणारे त्या वेळचे शिंदे सर वर्गात मला बसू देत नव्हते, ते म्हणायचे तू बारावीला नापास होशील, तुझी उपस्थिती कमी आहे, मी विनंती केली,मी म्हणायचं मी पास होईल सर. मराठी,इंग्रजी,हिंदी, इतिहास,राज्यशास्त्र, आणि संरक्षण शास्त्र असे विषय घेऊन मी बारावीला ७३ टक्के मार्कस मिळवले.मला इतिहास या विषयात ८८ मार्च मिळाले व पुणे विभागात इतिहासात प्रथम आलो आणि मला शिंदे सरांनी शाबासकी दिली. नंतर मी व शिवाजी लोटके या मित्रांसोबत डीएड चे फॉर्म आठ जिल्ह्यात जाऊन फॉर्म भरले. त्यावेळीच मी सैन्य दलात भरती होण्यासाठी छत्रपती संभाजी नगर मध्ये प्रयत्न केले .मी क्लार्क पदासाठी परीक्षा मैदानी चाचणी यशस्वी पूर्ण केली, मेडिकल झाले ,त्यावेळचे भरती अधिकारी श्री सत्यमूर्ति यांनी लेखी परीक्षा देताना आम्हाला सांगितले होते की क्लार्क मध्ये जे बंदे पास होतील त्यांना क्लार्क मध्ये भरती केले जाईल व जे जिडी मध्ये एक पेपर पास होतील त्यांना जीडी मध्ये दाखल केले जाईल.अशात माझा डीएड ला नंबर लागल्याचे पोष्टमन संजय शिरसागर यांनी लेटर आणून दिले. ते वाचून पाहिले तर प्रवेशाची तारीख होऊन गेली होती .पोष्टाचा संप आसल्याने त्यामुळे पत्र उशिरा आले होते .मी पत्र घेऊन आमच्या साकतच्या शाळेत गेलो ,खान गुरुजींनी मला सल्ला दिला तारीख जरी उलटून गेली असली तरी जाऊन प्रयत्न कर. उन्हाळ्यातच्या सुट्टीत काम केलेले असल्यामुळे माझ्याकडे ९०० रुपये शिल्लक होते. मी पुण्याला गेलो. त्यावेळी अहमदनगर ते पुणे पंचवीस रुपये तिकीट होते. शिवाजीनगर येथे उतरून, पाई विचारत,विचारत एरंडवणे येथे गेलो ,त्यावेळी तेथे पुणे जिल्ह्यातील सर्व डीएड कॉलेजचे प्राचार्य, क्लार्क, शिपाई ,शिक्षण अधिकारी शिवाजी ताबे साहेब एकाच ठिकाणी बसून आलेल्या मुलांना डीएडला प्रवेश देत होते. मी शिवाजी तांबे नावाचे शिक्षण अधिकारी होते त्यांच्या कडे गेलो.त्यांनी राजा शिवराय प्रतिष्ठानचे डीएड कॉलेज असलेले भोरला ऍडमिशन देण्याचे सांगितले.मी भोरच्या प्राचार्यांकडे गेलो.कागदपत्रे दाखवली.त्यांनी मला अँडमिशन साठी बाराशे रुपये मागितले. माझ्याकडे ९०० रुपये होते. मी उद्या तीनशे रुपये आणून देईल अशी म्हटले. माझ्या कडे पैसे नसल्याने मला त्यांनी अँडमिशन दिले नाही .पैसे घेऊन उद्या ये असे म्हटले. मी पुण्यात त्यावेळी बारावीचे शिक्षण डिसेंबर महिन्यात अर्धवट सोडून आमचे चुलते बाळासाहेब व शंकर आप्पाजी शिंदे यांनी त्यांच्या मेहुण्याच्या एका कंपनीत मला कामाला लावले .तेथे माझे राहण्याची सोय होई पर्यंत आमचे चुलत चुलते रावसाहेब शिंदे यांच्या घरी ठेवले.त्यांच्या घरी राहून मी कंपनीत काम करू लागलो. वेल्डरचा कोर्स केल्यामुळे मला सतत व पुढे आयुष्यभर लोखंडाशीस भिडावे,काम करावे लाघेल. म्हणून ते काम सोडून पुन्हा मी अहमदनगर ला आलो. हॉटेलचे काम सोडून दिले व रात्री कापड बाजारात दुधाच्या गाडीवर दुधाचे उष्टे ग्लास ५०० रुपये महिन्यांनी दोन महिने केले .व नंतर काम सोडून दिले . रात्री १२ ते परत संध्याकाळी ९ असा २१ तास अभ्यास करून बारावी पास झालो होतो. त्याकाळी फक्त तीन तास च झोपायचो. त्यामुळे च बारावीच्या परीक्षेत यश आले होते. हि तर त्यि वेळी भोसरीत असलेल्या आमचे चुलत चुलते रावसाहेब शिंदे काकांकडे डीएड चा ऍडमिशन साठी पैसे आणायला गेलो. त्यांनी मला दहा रुपयाच्या नोटा असलेले 1000 रुपयाचे एक बंडल दिला. ते घेऊन मी पुन्हा दुसऱ्या दिवशी डिएडचे अडमिशन घेण्यासाठी आलो तर भोरच्या प्राचार्यांनी आमचे प्रवेश संपले असे सांगितले. माझी तळपायाची आग मस्तकात गेली. मला त्यावेळी शिष्टाचार माहित नव्हते.मी रागाने सर्व प्रकार शिक्षणाधिकारी यांना सांगितला.तर त्यांनी मला बदलून शासकीय डीएड कॉलेज महात्मा गांधी अध्यापक विद्यालय दिले.मुलगा गरीब आहे ,शिकण्याची परिस्थिती नाही, असे त्यांच्या लक्षात आले होते. महात्मा गांधी अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य कै. श्रीकांत जोशी सर यांनी माझे ऍडमिशन केले . फी होती एकशे चार रुपये .हॉस्टेलची फी होती सातशे ,अशा पद्धतीने माझे डीएड ला ऍडमिशन झाले डीएड चे प्रथम वर्ष संपले व द्वितीय वर्षाला सुरुवात झाली. त्यावेळी मला एका मित्राने एस.टी.डीत काम मिळून दिले. दुपारी पाच ते रात्री बारा पर्यंत मी काम करायचो. मला पाचशे रुपये मिळवायचं .रात्री बारा वाजता होस्टेलवर गेल्यानंतर दोन भाकरी चा स्वयंपाक करून जेवायचो. त्यावेळी रूममध्ये असलेले संतोष पन्हाळे , पंढरीनाथ कामढे, किशोर मेधने, अनूप खरात या मित्रांनी खुप सहकार्य केले. अशाप्रकारे बापू चे डीएड चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, ५/३/१९९७ ला अहमदनगर येथील झकेरिया आघाडी हायस्कूलमध्ये मला आब्बास खान गुरुजींनी नोकरीस लावले. येथे एक वर्ष पुर्ण झाल्यानंतर बीड जिल्हा परिषदेची शिक्षक भरतीची परीक्षा दिली व बापू शिंदे व मनोरंजन धस साहेब हे त्यावेळी एकाच रूमवर बीडला परीक्षेला मुक्कामी होते. परीक्षा पास होऊन बापू शिंदे सरांना २४/०७/१९९८ रोजी पाटोदा तालुक्यातील पारनेर येथील शिखरवाडी येथे रुजू झाले. बीड जिल्हा परिषदेचे तत्कालीन शिक्षणाधिकारी पाटील साहेब व सीईओ सुभाष लोळगे साहेब यांनी नवीन शिक्षकांचे आदेश स्व तालुक्यात न देता आदेश दुसऱ्या तालुक्यात दिले.त्यामुळे त्यावेळचे तत्कालीन जिल्हा परिषद बीड चे उपाध्यक्ष आमदार सुरेश धस साहेब (अण्णा ) यांनी दिलेले सर्व आदेश रद्द करून पुन्हा नव्याने मुख्य कार्यकारी अधिकारी लोळगे साहेब व शिक्षणाधिकाऱ्यांना सांगितले की शिक्षकांना स्व तालुक्यात आदेश बदलून दिले. बापू शिंदे सर यांना परत आदेश बदलून ०४/०८/१९९८ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हातोला केंद्र पाटसरा तालुका आष्टी येथे पदस्थापना मिळाली . येथे पाच महिने काम केल्यानंतर ३१ डिसेंबर१९९८ रोजी त्यांची बदली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोकळेवस्ती लोणी (सय्यदमीर) केंद्र . पिंपळा तालुका आष्टी येथे झाली.ते ०१/०१/१९९९ रोजी रुजू झिले.पोकळीवस्ती येथे १० वर्षे त्यांनी अतिशय तळमळीने विद्यार्थ्यांना शिकवले. तत्कालीन विभागीय आयुक्त व्ही.रमणी यांनी सुरू केलेला विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी चा व्ही रमणी पॅटर्न मध्ये त्यांच्या पोकळे वस्ती शाळेचा पिंपळा केंद्रात प्रथम क्रमांक आला होता. त्यानंतर त्यांची पती-पत्नी एकत्रीकरणात शिवाजी शिंदे साहेब गटशिक्षणाधिकारी असताना मनोजराव धस साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जि.प.केंद्रीय प्राथमिक अंभोरा केंद्र शाळा येथे बदली झाली.०५/०६/२००८ ते २१/०६/२०१८ अशी दहा वर्षां अंभोरा शाळेत त्यांनी काम केले. शिष्यवृत्ती ,अप्रगत विद्यार्थ्यांना प्रगत करणे, जादा तास घेणे ,शैक्षणिक साहित्य निर्मिती, ज्ञानरचनावाद सहल,अशे शैक्षणिक उपक्रम शाळेत राबवले. अंभोरा केंद्र शाळेचा केंद्रीय मुख्याध्यापक पदाचा इन्चार्ज म्हणूननही त्यांनी एक दिड वर्षे काम केले. त्यांच्या शैक्षणिक कार्याच्या जडणघडीत त्यांचे मित्र,मार्गदर्शक बीड जिल्हा परिषद बीड चे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन साहेब,लोकनेते सुरेश आण्णा धस साहेब यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन असते. दोन वर्षे त्यांनी आष्टी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात विषय तज्ज्ञ म्हणून ही काम केले आहे. ऑनलाइन बदली प्रक्रियेत त्यांची पुसरा तालुका वडवणी येथे सन ,२२/०६/२०१८ ला बदली झाली.पाच वर्षे अतिशय नियमितपणे व दर्जेदार पुसरा शाळेत त्यांनी अध्यापन केले. ३०/०५/२०२३रोजी पुन्हा ऑनलाईन बदली प्रक्रियेत पती-पत्नी एकत्रीकरणात त्यांची जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टी हरिनारायण येथे त्यांची बदली झाली.त्यांची पत्नीश्रीमती गवळी द्रौपदी विठ्ठलराव यांची मनापासून त्यांना प्रत्येक गोष्टीत साथ असते .त्यांनी पुसरा शाळेत अनेक उपक्रम राबवले .स्काउट गाईडचा जिल्हा मेळावा तत्कालीन बीड जिल्हा आयुक्त स्काऊट संतोष मानूरकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणीत घेण्यात आला .त्यात बापू शिंदे सरांचा सिंहाचा वाटा होता .सध्या ते बीड जिल्हा भारत स्काऊचे संघटक योगे आवढाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट पदी कार्यरत आहेत. त्यांना त्यांच्या कार्याची दखल घेऊन अँड शिवाजी कराळे आण्णा यांच्या शिवशंभो प्रतिष्ठान चा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार, अशोक लोखंडे सर यांच्या आसराबाई लोखंडे सेवाभावी संस्थेचा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार, स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित कडाचा आदर्श शिक्षक पुरस्कार, महादेव आमले सर यांच्या वतीने अंबेश्वर वाचनालय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेले आहेत. बापू शिंदे सर यांची एकूण सेवा २६ वर्ष ०८ महिने पूर्ण झालेली आहे.शिंदे सर यांचा अनेक उपक्रमात सहभाग असतो. त्यांना गावातील सामाजिक कार्याची आवड आहे. प्रत्येक गावातील सामाजिक कार्यात ते हिरीरीने सहभाग घेतात.

आज ११ एप्रिल २०२५ रोजी बापू शिंदे सर यांचा ५० वा वाढदिवस असून , वाढदिवसाच्या निमित्ताने बापू शिंदे सरांना मनापासून हार्दिक शुभेच्छा .

**शब्दांकन**
**बाळासाहेब रकटाटे**
**अंभोरा**

# श्रद्धा, शांतता, संस्कृती व परंपरा जपणारे गाव म्हणजे जिंती

**जिंतीच्या यात्रेचा मुख्य दिवस १२ एप्रिल रोजी.**

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीतेतून आदर्श गावाची संकल्पना मांडली आहे. आपला गाव, गावातील माणसे, गाव शिव राखण करणारी थळ पांढरी देवता, गावातील बाळांचे रक्षण करणारी माता सटवाई, गावातल्या सर्वांचे रक्षण करणारी वाघजाई माता, गावाला आशीर्वादाच्या रूपाने लाभलेली खोचरेवाडीत उभे असलेले महादेवाचे मंदिर. सेवेचा वारसा देणारे हनुमान मंदिर, या गावाची परंपरा सांगणारे आहे. गावचे आरोग्य सांभाळणारी गावातील तालीम. पाहुण्याचा निरोप सांगायला येणारा पोस्टमन, कामावरून थकून बघून आल्यानंतर चावडी कट्ट्यावर बसणारी, गप्पा मारणारी माणसं. गावाला बलवान बनवणारा कुस्तीचा आखाडा, तांबड फुटायच्या वेळी देवळातल्या घंटेच्या नादानं जागा होणारा गाव, कुटुंबासह सोबत गोठ्यातल्या गाईगुरावर, बैलजोडीच्या ढवळ्या पवळ्यावर प्रेम करणारा गावगाड्यातील माणूस गावातच भेटतो. गावच्या पांढरीत राहणारा आणि गावच्या मातीवर प्रेम करणारा जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी या गावातच राबतो, कष्टतो. गाव हेच त्याचं सारं विश्व. गावचे देऊळ हीच त्याची श्रद्धा आणि गावातील लोकांचे प्रेम, सद्भाव हीच त्याची श्रीमंती. एवढेच आयुष्याचं साधं-सुधं जगण्याचं तत्त्व घेऊन गावातील माणूस जगत असतो.

गावात एखादा माणूस किंवा पाहुणा एकमेकाला भेटला तर राम - राम, नमस्कार, राम कृष्ण हरी अशा शब्दांनी स्वागत करतो. गावातील स्त्रिया, माता भगिनी गावातील अनेक सणवार साजरे करून गावची इज्जत, गावचा रुबाब, गावची संस्कृती जपत असतात. असा गाव पाहायला मिळणे आज मोठे कठीण झाले आहे. कारण असा गाव पुन्हा पाहता येईल का? असा प्रश्न पडल्या वाचून राहत नाही. अनेक गाण्यातून, कवितेतून गावांची वर्णने केली आहेत

किलबिल किलबिल पक्षी बोलती,
झुळझुळ झुळझुळ झरे वाहती
पानोपानी फुले बहरती* *फुलपाखरे वर भिरभिरती
स्वप्नी आले काही, एक मी गाव पाहिला बाई.

असा गाव आपणास लाभणे हे केवढे मोठे भाग्य असे मनात सतत वाटत राहते. आता बदलत्या काळानुसार गावात गावाचं गावपण हरवते की काय? खेळाची मैदानी संपतात की काय ? मातीचे सिमेंट कधी झाले आणि गावात, गाव आणि माणूस राहिलाच नाही अशी स्थिती असताना सुद्धा गावातील *श्रद्धा, संस्कार,संस्कृती, परंपरा जपणारं, सह्याद्रीच्या कुशीत आईच्या मांडीवर बाळ बसावं असं वसलेलं सुंदर रम्य गाव म्हणजे जिंती.

निमित्त आहे जिंती येथील ग्रामदैवत म्हणजे * श्री ज्योतिर्लिंगाची प्रतिवर्षी वसंत ऋतूत भरणारी यात्रा* आणि यात्रेसाठी जमलेला गाव. सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्याच्या दक्षिणेला सांगली आणि सातारा याच्या सीमेवर डोंगररांगांनी वेढलेल्या वनराईने समृद्ध असणाऱ्या पंधराशे ते दोन हजार वस्तीचे छोटेसे गाव म्हणजे जिंती.गावाच्या सभोवती खोचरेवाडी, चव्हाण मळा, अकाईवाडी, बागलवाडी, बोत्रेवाडी, शेवाळेवाडी, महारुगडेवाडी छोट्या भावंडाप्रमाणे विस्तारलेली वाडी वस्तीतील घरे गावाला समृद्ध करतात.जिंती गावचा भौगोलिक परिसर पाहता सह्याद्रीच्या खडकाशी धडका घेणारा माणूस जीवन जगताना दिसतो. इथल्या मातीत,डोंगराळ, खडकाळ माळरान. मुरमाड मातीत अनेक सुविधांपासून वंचित असलेलं जिंती गाव शहरापासून दूर, पाण्याची कमतरता असलेलं गाव.सार्वजनिक वहातूकीच्या साधनाचा अभाव. पण कराड दक्षिणचे अध्वर्यु सलग 35 वर्षे या भागाचे नेतृत्व करणारे स्वर्गीय विलासरावजी पाटील उंडाळकर (काका) यांनी या भागातील गावांचा वाडीवस्तींचा चेहरा मोहरा बदलला. आपल्या भगीरथ प्रयत्नाने गावच्या परिसरात मध्यम प्रकल्पाचे बंधारे, छोटी धरणे बांधून गावाचा परिसर सुजलाम-सुफलाम केला आहे. देशात प्रथमता नदीजोड प्रकल्प राबवून वारणेचे पाणी कराडच्या दक्षिण मान नदीत सोडले आणि काठावरची गावे जलमय झाली शेती बहरली माळराने फुलली आणि माणसाची मनेदेखील सुगंधित झाली.

**जिंती गावातील जनजीवन.**

गरिबीत आणि हालाखीत जीवन जगणाऱ्या लोकांनी आपला चरितार्थ चालवण्यासाठी मुंबईची वाट धरली होती. गावात फक्त प्राथमिक शिक्षणाची सोय होती. आपली शेतीभाडी आणि गुरुढोरे सांभाळत राहणारा गावातला माणूस. मुंबईहून कमावून आणलेल्या मुलांच्या दोन पैशावर कुटुंब चालवत राहायचं, तरीही आपलं गाव तळहाच्या फोडाप्रमाणे जपलं ते ज्योतिर्लिंगाच्या आशीर्वादाने.

आज गावाच्या मध्यभागी जणू गावच्या हृदयाच्या ठिकाणी भव्य असे ज्योतिर्लिंगाचे शुभ्र संगमरवरात उभारलेले मंदिर गावाचे वैभव सूचित करणारे आहे. गावाची एकजूट आणि भक्तीभाव,गाव वर्गणी यातून मंदिराची उभारणी केली आहे.. दानशूर व्यक्तीने केलेले औदार्य हे श्रद्धा आणि भक्तीभावाचे प्रतिक आहे. भाविकाच्या मनात श्रद्धेच्या झरा पाझरतो तेव्हा ओंजळीतल्या पाण्याला सुद्धा गंगेचे रूप प्राप्त होते ही भावोत्कटता मंदिर उभारणीत झाली आहे. गावात झालेला बदल,गावात आलेली समृद्धी, झालेल्या भौतिक सुधारण्याचे प्रतिक आहे. तरीही गावाने भक्ती भाव जोपासला आहे. गावाला संस्कार देणारी गावात वारकरी संप्रदायाचे लोक गावात संतांचे विचार तेवत ठेवून ज्ञानोबा तुकोबांची भक्ती मनोभावे करत आहेत. तर गावातील बौद्ध समाजातील लोक तथागत भगवान बुद्धाचा आणि भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा परिवर्तनवादी विचार जोपासून आपली प्रगती करत आहे. अख्खा गाव सर्व समाजात समभाव बाळगून शांतता व परस्परातील प्रेमभाव जपत आहेत.

अलीकडच्या दहा वर्षात गावच्या लौकिकात भर घालणारा तरुण वर्ग मोठ- मोठ्या क्षेत्रात कार्यरत आहेत, मुंबई, पुणे, देशात आणि देशाबाहेर देखील आपल्या कर्तुत्वाचा ध्वज फडकवित आहेत.

शिक्षक, प्राचार्य, लिपिक वर्ग डॉक्टर, इंजिनिअर, उद्योजक,पीएचडी धारक उच्चविद्याविभूषित तरुणवर्ग, पत्रकार, , अभियंते आयटी क्षेत्रात व कार्पोरेट जगतात युवक युवती कार्यरत आहेत. सर्वांनी आपल्या काळजात गावचे नाव करून ठेवले आहे. यात्रेच्या रूपाने सर्वांची पावले गावाच्या दिशेने येऊ लागतात. त्यांच्या उरी स्वप्न असते,*" माझा गाव बदलला पाहिजे यासाठी गावातील गणेशोत्सव मंडळे, दुर्गामाता उत्सव मंडळे, महिला बचत गट, पतसंस्था, विकास सेवा सोसायटी, ग्रामपंचायत कार्यालय, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य, सर्व पदाधिकारी कार्यरत असून, गावात *ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन जिंती* या नावाने सेवाभावी संस्था कार्य करत आहे. गावातील पर्यावरण संवर्धनापासून ते गावातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणापर्यंत प्रत्येक बाबीत विधायकपणे समाजाच्या आणि व्यक्तीच्या उन्नतीचे कार्य करत आहे. यावर्षी पावसाळ्यात पीराच्या डोंगरावर तितक्याच भक्ती भावाने एक लाख बियांचे रोपण ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन जिंती व गावातील युवक आणि शाळेतील विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या व निसर्गप्रेमी मित्रांच्या सहकार्याने केले. गुणवंत व नावलौकिक मिळवणाऱ्या प्रज्ञावंतांचा सत्कार, गुणगौरव व शिक्षक गुरुजनांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा कार्यक्रम ही गावात ही सेवाभावी संस्था करत असते.याच्यातून पुढील पिढीला निश्चितच प्रेरणा मिळते आहे.गावातील सर्वच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, क्षेत्रातील लोक एकत्र येऊन आपले राजकीय मतभेद बाजूला ठेवून गावाच्या विकासासाठी गावगाडा सुरळीत चालण्यासाठी प्रयत्नशील राहतात ही गावाच्या वैभवात भर टाकणारी बाब आहे.

**जिंती गावची वेगळी ओळख**

जिंती गाव कधी वसले याचा निश्चित कालखंड सांगता येत नसला तरी 'व्हला' या पक्षाचा अधिवास असलेले जिंती म्हणून या गावाची ओळख खूप वर्षापासूनची आहे.या गावाची ओळख बैलगाडा शर्यतीत धावणाऱ्या देशी खिलार बैलांमुळेही आहे. जिंती आणि परिसरातल्या वाडीतला पैलवान महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे,अनेक खेळाडू,आणि पैलवान या मातीने दिली आहेत. यामुळेच या देशाची सेवा करणारे अनेक सैनिक या गावाने या देशाला दिले आहेत. पोलिस आणि उच्चपदस्थ अधिकारी सुद्धा या गावातून घडले आहेत. या गावात लग्नकार्यात तरुण मंडळी खांद्यावर पाण्याने भरलेली घागर घेऊन ती नाचवण्याची प्रथा आहे. आजही ती युवकांकडून जपली जाते. आज जिंती सुख, संपन्नता समृद्धी आरोग्य यांनी नांदते आहे ही ग्रामदैवत श्री ज्योतिर्लिंगाची कृपा आपल्यावर आहे असा भक्ती भाव लोकांच्या मनात आहे. गावोगावच्या यात्रा म्हणजे, करमणुकीच्या कार्यक्रमाला तमाशा, आर्केस्ट्रा यासारख्या बाबी येतात, परंतु जिंतीच्या यात्रेत विधायक कार्यक्रम घेऊन यात्रा साजरी केली जाते.भक्तीभावात ही वैज्ञानिक दृष्टी जोपासली जात आहे. आपला चांगुलपणा, परस्परातील प्रेम, नम्रता आणि संस्कृतीचे जतन करून श्रद्धा, संस्कार आणि परंपरा राखून गावाचे गावपण आबाधित ठेवण्याचा प्रयत्न सर्व गावकरी करत आहेत. अशा सर्व गावकऱ्यांना आणि ग्रामस्थांना ज्योतिर्लिंगाचे आशीर्वाद राहो आणि गावात सुख-समृद्धी संपन्नता लाभो ही प्रार्थना करायला आपोआपच हृदयापासून हात जोडले जातात. आज-काल अनेक गावांमध्ये गावांमध्ये बरेच शहरीकरण वाढतंय..... गावाच्या च्या मातीच्या रस्त्यांची कॉंक्रिटीकरण होत आहे. संकुचित विचारांच्या भिंती गावामधील गावपण वेगळे करताना दिसत आहेत. भौतिक विकास व्हायलाच हवा, खेड्यांचे दरिद्रीपण जायला हवे पण त्याच खेड्यातील माणसाच्या मनाची श्रीमंती की बहरली पाहिजे. मातीतून माणसे उभारली पाहिजेत पण माणुसकीची माती होता कामा नये याची काळजी विवेक बुद्धीने घेण्याचे संस्कार गावातून झाले पाहिजेत आणि ते शिक्षणाशिवाय कोण करेल,? हा खरा प्रश्न आहे. शिक्षण आणि संस्काराने सुदृढ झालेली पिढी गावाला नव्या संकल्पनेचे आकार देऊ पाहते आहे हे लक्षात घ्यायलाच हवे म्हणून जिंती गावानेच निर्धार केला आहे गावातल्या शैक्षणिक संकुलाची उन्नती होऊन जगाच्या स्पर्धेत टिकणारा युवक या शिक्षणातून घडावा यासाठी सर्व प्रयत्नशील आहेत.



जिंती गावात महिला व बालकल्याण विभागाची अंगणवाडी व सातारा जिल्हा परिषदेची पहिली ते सातवीपर्यंतची *जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जिंती* ही एक आदर्श शाळा म्हणून लौकिकास पात्र ठरली आहे.ग्रामीण विकास शिक्षण संस्था उंडाळे या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आठवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची माध्यमिक शिक्षणाची सोय करणारे *श्री ज्योतिर्लिंग विद्यालय जिंती* हे ग्रामदेवतेच्या नावाने सुरू असलेले, आय एस ओ मानांकन प्राप्त असलेले विद्यालय शिक्षणाचे कार्य दर्जेदारपणे करत आहे. यातून गावातील नवीन पिढी संस्कारक्षम घडण्यास मदत होत आहे. यावर्षीच्या यात्रेच्या निमित्ताने कोल्हापूर येथील मा.श्री पिष्टे सर यांचा व्यक्तिमत्व विकास यावर आधारित संमोहनाचा कार्यक्रम आयोजित केला असून या कार्यक्रमात यावर्षीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव गावातील ग्रामस्थांच्या व ज्ञानप्रबोधिनी फाउंडेशन जिंतीच्या वतीने करण्यात येत आहे.विविध स्पर्धा परीक्षेत, विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांनी, युवकांनी गावाच्या लौकिकात भर घातल्याने यात्रेचे औचित्य साधून त्यांचा गुणगौरव करताना ग्रामस्थांना अभिमान वाटतो आहे. आपला चांगुलपणा, परस्परातील प्रेम, नम्रता आणि संस्कृतीचे जतन करून श्रद्धा, संस्कार आणि परंपरा राखून गावाचे गावपण आबाधित ठेवण्याचा प्रयत्न सर्व गावकरी करत आहेत. अशा सर्व गावकऱ्यांना आणि ग्रामस्थांना ज्योतिर्लिंगाचे आशीर्वाद राहो आणि गावात सुख-समृद्धी संपन्नता लाभो ही प्रार्थना करायला आपोआपच हृदयापासून हात जोडले जातात. याप्रसंगी मनात विचार येतो *गड्या आपला गाव बरा*